दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१५ | सोमवार, दि.५ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महायुतीच्या नेत्यांची घुमवाघूमवी

विधानसभा निवडणुकीदरम्यान महायुतीने आश्वासनांचा अक्षरश: पाऊस पाडला. राज्याच्या तिजोरीच्या आवाक्या बाहेरच्या घोषणा करताना लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफी, कृषी वीज बिल माफी, एसएमपीच्या २० टक्के प्रोत्साहन देऊन शेतमालाची खरेदी, शेतकरी सन्मान योजनेत निधी वाढ अशा एकापेक्षा एक शक्य न होणाऱ्या घोषणा केल्या. आता मात्र उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित दादा कर्जमाफीची घोषणा मी केली होती का? असा प्रश्न विचारत आहेत.

## बारावीचा निकाल आज

पुणे: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी (दि.५ मे) दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना विषयनिहाय मिळालेल्या गुणांचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध होईल, तसेच त्याची मुद्रित प्रत घेता येणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी दिली आहे. यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्चदरम्यान घेण्यात आली. राज्यातील १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. नुकताच सीआयसीएसई बोर्डाचा निकाल जाहीर झाला आहे. तर अद्याप सीबीएसईचा निकाल लागणे बाकी आहे. विद्यार्थ्यांना mahahsscboard.in, mahresult.nic.in या संकेतस्थळावरून निकाल पाहता येणार आहे.

# शेतकऱ्यांनी 'एचटीबीटी' बियाणे टाळावे

### कृषी विभागाचे आवाहन, अवैध पुरवठ्यावर 'गुणनियंत्रण'ची नजर

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात बंदी असूनही अवैधरीत्या 'एचटीबीटी' कापूस बियाण्यांची उपलब्धता करून लागवड केली जाते. या बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत व उगवणक्षमतेबद्दल कोणतीही उत्पादक किंवा विक्रेते जबाबदारी घेत नाही. खरेदीचे पक्के बिल नसल्याने शेतकरी तक्रार करू शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी संभाव्य फसवणूक व नुकसान टाळण्यासाठी अवैध एसटीबीटी बियाणे खरेदी टाळावी. असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. या पार्श्वभूमीवर या बियाणे विक्रीपुरवठ्यावर गुणनियंत्रण विभागाची नजर आहे.**



एचटीबीटी कापूस वाणाला कोणी चोर बीटी, राऊंडअप बीटी कुणी आरआरबीटी म्हणतात. ग्लायफोसेट या तणनाशकाला प्रतिकार करणारे घटक यात असल्याचे सांगितले जाते. मात्र, बाबतचा कुठलाही अभ्यासपूर्ण संशोधन अहवाल अधिकृतरीत्या प्रसिद्ध झालेला दिसून येत नाही. तसेच लागवडीसाठी शिफारस नाही.त्यामुळे उत्पादन व उत्पन्नवाढीचा हा दावा दिशाभूल करणारा आहे, असे कृषी विभागाने कळविले आहे. केंद्र सरकारच्या जीईसी समितीची या बियाण्यास मान्यता नाही. तसेच विद्यापीठांची शिफारस नाही.त्यामुळे अवैध विक्रेते एचटीबीटी बियाण्यांची खरेदी-विक्री बिगर बिलाने करतात. यासह लागवड पश्चात उगवणक्षमता, बोंड न लागणे, उत्पादन कमी येणे अशा ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### मॅरेज जिहादची चौकशी करा–गुणरत्न सदावर्ते

मुंबई : हजारो पाकिस्तानी महिला विवाह करून भारतात वास्तव्य करत आहेत. त्यामुळे दहशतवाद्यांच्या कारवायांसाठी देशात मॅरेज जिहाद तर सुरू नाही ना? अशी शंका वकील गुणरत्न सदावर्तेंनी व्यक्त केली आहे. त्यामुळे संपूर्ण देशात मॅरेज जिहादची चौकशी करा अशी मागणी सदावर्तेंनी राज्य सरकारकडे केली आहे.

### भारताच्या कारवाईनं पाकिस्तान बिथरला

नवी दिल्ली : घाबरलेल्या पाकिस्तानने संसदीय अधिवेशन बोलावले आहे. हे अधिवेशन सायंकाळी ५ वा. राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी बोलावले आहे.

### अमृतसरमध्ये २ पाकिस्तानी गुप्तहेरांना अटक

अमृतसर : पंजाब पोलिसांनी शी संबंधित दोन गुप्तहेरांना अटक केली आहे. पलाक शेर मसीह आणि सूरज मसीह अशी या दोघांची नावं आहेत. या दोघांवर भारतीय सैन्याची गोपनीय माहिती पाकिस्तानला पाठवल्याचा आरोप आहे. या दोन्ही आरोपींनी भारतीय सैन्याची छावणी, एअरबेस आणि अन्य संवेदनशील क्षेत्राचे फोटो, माहिती शत्रू देशाला दिल्याचे तपासात उघड झाले आहे. ही सर्व माहिती जेलमध्ये अटकेत असलेल्या गँगस्टर हरप्रीत सिंग उर्फ पिट्टूच्या हॅप्पी नेटवर्कच्या माध्यमातून पाठवली जात होती.

### तुळजाभवानी मंदिरात बोगस व्हीआयपींना थेटदर्शन बंदी

तुळजापुर– तुळजाभवानी मंदीरात आता बोगस व्हीआयपींना थेट दर्शन बंदीचा निर्णय घेण्यात आला आहे. व्हीआयपी पास वाटपावरून अनेकांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या त्या अनुषंगाने मंदीर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. व्हिआएपी दर्शन पासमध्ये भ्रष्टाचार केला जात असल्याच्या तक्रार खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांनी केली होती. त्यानंतर आता बोगस व्हीआयपींना दर्शन पास न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### राजस्थानात एका पाकिस्तानी रेंजर्सला अटक

जयपुर– पहलगाम दहशतवादी हल्ल्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणाव वाढत असताना बीएसएफ मोठे यश मिळाले आहे. बीएसएफने राजस्थान सीमेवर एका पाकिस्तानी जवानाला अटक करुन ताब्यात घेतले आहे. राजस्थानमधील श्रीगंगानगरमध्ये सुरक्षा दलांना हे यश मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. सुरुवातीच्या माहितीनुसार, पाकिस्तानी जवान सीमेत घुसण्याचा प्रयत्न करत होता, त्यानंतर बीएसएफने त्याला रोखले आणि ताब्यात घेतले. तो कोणत्या उद्देशाने सीमा ओलांडत होता हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### भारत हा गांधींचा देश– फारूख अब्दुल्ला

श्रीनगर : भारत हा महात्मा गांधींचा देश आहे. आपण पाकिस्तानचे पाणी थांबवू शकतो, मात्र त्यांना मारणार नाही. असे वक्तव्य जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला यांनी केले आहे. भारत हा पाकिस्तान इतका क्रूर नाही. असेही फारूख अब्दुल्ला यांनी म्हटले आहे.

# मुंडेंकडून १८ तुकडे करण्याची धमकी

### करुणा शर्मांचा गंभीर आरोप



**मुंबई । प्रतिनिधी**

**करुणा शर्मा यांनी पुन्हा एकदा माजी मंत्री धनंजय मुंडेंच्या विरोधात बांद्रा न्यायालयात धाव घेतली आहे. करुणा शर्मा यांनी ऑक्टोबर २०२० पासून पोटगीची ६० लाखांची थकबाकी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी द्यावी यासाठी वांद्रे कोर्टात तीन अर्ज दाखल केले आहेत. त्याचबरोबर धनंजय मुंडे यांच्याकडून धमक्या आणि छळ सुरूच असल्याची लेखी तक्रार करुणा शर्मा यांनी कोर्टात केली आहे. धनंजय मुंडेंकडून मला १८ तुकडे करण्याची धमकी आली असल्याचा गंभीर आरोप करुणा शर्मा यांनी केला आहे.**

यावेळी बोलताना करुणा शर्मा यांनी काही गंभीर आरोप देखील केले आहेत. करुणा शर्मा म्हणाल्या की, मला २ लाख पोटगी मिळाली, तेव्हापासून आणि आमदारकी रद्द होणार असं कोर्टाकडून नोटीस देण्यात आली, तेव्हापासून मला धमक्या येत आहेत. स्वत: धनंजय ◀◀ पान २ वर

# मविआकडून अजितदादांना मुख्यमंत्रिपदाची ऑफर

### विनायक राऊत यांचे मोठे वक्तव्य, अट काय ती सुध्दा सांगितली





**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्रिपदासाठी योग जुळून यावा लागतो, मलाही वाटतं मुख्यमंत्री व्हाव, पण कुठे जमतंय, असे वक्तव्य अजित पवार यांनी केले होते, त्यानंतर सुनिल तटकरे यांनी सुध्दा पुढचे मुख्यमंत्री अजितदादाच असतील, असे सांगितल्याने राजकीय गोटात खळबळ माजली होती. आता त्यांना मविआचेते ◀◀ पान २ वर

### नेमकं काय म्हणाले विनायक राऊत?

विनायक राऊत यांनी अजित पवार यांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. अजित पवार यांनी महाविकास आघाडीमध्ये यावे, त्यांचे मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पूर्ण होईल असे विनायक राऊत यांनी म्हटले आहे. तसेच त्यासाठी त्यांनी अगोदर महाविकास आघाडीत यावे, अशी अटही त्यांनी टाकली आहे.

# मी नव्हतो, पण मी काँग्रेसच्या चुकांची जबाबदारी घेतो!

### १९८४ च्या दंगलीबाबत शीख युवकाच्या प्रश्नाला राहूल गांधींचे उत्तर



वॉशिंग्टन / वृत्तसंस्था

अमेरिकेच्या ब्राउन विद्यापीठातील वॉटसन इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल अँड पब्लिक अफेअर्स येथे दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या संवाद सत्रात, काँग्रेस नेते राहुल गांधी यांना १९८४ च्या शीखविरोधी दंगली संदर्भात रोखठोक प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना राहुल गांधी म्हणाले की, "अनेक चुका ज्या काळात घडल्या, जेव्हा मी तिथे नव्हतो, पण तरीही काँग्रेस पक्षाने इतिहासात केलेल्या प्रत्येक चुकीची जबाबदारी घ्यायला मी तयार आहे."

या सत्रात एका शीख युवकाने राहुल गांधींच्या आधीच्या विधानाचा संदर्भ घेत विचारले की, "तुम्ही म्हणता की भारतात शीख व्यक्तींना तुरबण घालण्याची किंवा गुरुद्वाऱ्यात जाण्याची मुभा असावी. पण आमचे मागणे इतकेच मर्यादित नाही आम्हाला अभिव्यक्तीं स्वातंत्र्य हवंय, जे काँग्रेसच्या ◀◀ पान २ वर

## १२८ वर्षीय योगगुरू बाबा शिवानंद यांचे निधन



**वाराणसी । वृत्तसंस्था**

**योगगुरू बाबा शिवानंद यांचे शनिवारी (दि.३ मे) रात्री वाराणसीत निधन झाले. ते १२८ वर्षांचे होते. श्वसनास त्रास होत असल्याने गेल्या तीन दिवसांपासून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. बाबा शिवानंद यांना २१ मार्च २०२२ रोजी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. पद्मश्री पुरस्कार मिळवणारे ते देशातील सर्वात ज्येष्ठ व्यक्ती ठरले होते.**

बाबा शिवानंद यांच्या जन्म ८ ऑगस्ट १८९६ रोजी पश्चिम बंगालमधील श्रीहट्टी येथील ◀◀ पान २ वर

## सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्याच्या निर्णयाचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी केले समर्थन



**नागपूर । प्रतिनिधी**

**राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजना सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या योजनेसाठी विविध विभागांच्या निधीतून रक्कम वळवण्यात आल्याने मंत्र्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. विशेषत: सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याने मंत्री संजय शिरसाट यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. मात्र, भाजपचे नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निधी वळवण्याच्या निर्णयाचे समर्थन केले आहे.**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, संजय शिरसाट काय बोलले, हे समजून घ्यावे लागेल. लाडकी बहीण योजना आदिवासी भागात आणि सामाजिक ◀◀ पान २ वर

## भारताचा पाकिस्तानवर वॉटर स्ट्राईक सुरूच, आता बागलीहार धरणातून चिनाबचे पाणी थांबवले

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला त्याची जागा दाखवण्यासाठी सर्व बाजूंनी मुस्कटदाबी सुरू केली आहे. सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर वुलर सरोवराचे पाणीही पाकिस्तानसाठी बंद केले. आता त्यापुढे जाऊन चिनाब नदीवर असलेल्या बागलीहार प्रकल्पाचे पाणी अडवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा पाकिस्तानसाठी आणखी एक धक्का असल्याचं सांगितले जात आहे.**

जम्मू-कश्मीरमधील बागलीहार जलविद्युत प्रकल्प पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील वादाचा केंद्रबिंदू ◀◀ पान २ वर

# शिवसेना पक्ष ठाकरेंचा का शिंदेंचा?

### बुधवारी होणार सुनावणी



**मुंबई । प्रतिनिधी**

**शिवसेनेतील फुटीनंतर निवडणूक आयोगाने शिवसेना आणि धनुष्यबाण हे एकनाथ शिंदे यांना दिले होते. या निर्णयाच्या विरोधात उद्धव ठाकरे हे सुप्रीम कोर्टात गेले होते. या प्रकरणी फेब्रुवारी २०२३ मध्ये त्यांनी याचिका दाखल केली होती. आता या प्रकरणी कोर्टात बुधवारी (७ मे) सुनावणी होणार आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह कोणाचे यावर फैसला होणार आहे.**

शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर एकनाथ शिंदे भाजपच्या पाठिंब्याने मुख्यमंत्री झाले. त्यावेळी एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांना निवडणूक आयोगाने वेगवेगळे चिन्ह दिले होते. मात्र, पुढे निर्णय देताना निवडणूक आयोगाने शिवसेना मूळ पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदेंना देण्याचा निर्णय घेतला होता. तत्कालीन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी देखील शिंदेंच्या बाजूने फैसला दिला होता. त्यांच्या निर्णयामुळे एकनाथ शिंदेंसोबत असलेले आमदार अपात्र ठरले नव्हते. तसेच विधिमंडळातील शिवसेना पक्ष एकनाथ शिंदेंकडे राहिला होता. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती पुन्हा सत्तेत आली. शिंदेंचे उमेदवार धनुष्यबाण चिन्हावर लढले होते.

बुधवारी होणाऱ्या सुनावणीमध्ये शिवसेना मूळ पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावर काय निर्णय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल. न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायाधीश कोटेश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होणार आहे. तब्बल दीड वर्षानंतर याबाबत सुनावणी होत असल्याने ◀◀ पान २ वर

# नवा अवतार राक्षसरुपी भाजपाचे खलत्व नष्ट करेल-हर्षवर्धन सपकाळ

### काँग्रेसच्या सद्भावना यात्रेला परभणीतील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; आज संविधान बचाव यात्रा



**परभणी । प्रतिनिधी**

भक्त प्रल्हादाची जी भक्ती आहे तशीच भक्ती काँग्रेस जनांच्या आचार, विचार आणि उच्चारातून दिसत आहे. आपण काँग्रेस काँग्रेस म्हणत आहोत तर दुसरा रावणाचा छळणारा विचार आहे तो पक्षांतर करा म्हणतो, आमचेच बरोबर आहे हे सांगतो. भक्त प्रल्हादाच्या भक्तीने नृसिंहाचा अवतार झाला तसाच नृसिंह अवतार ईव्हीएम किंवा बॅलेट पेपरमधून होईल आणि राक्षसरुपी भाजपाचे खलत्व नष्ट केल्याशिवाय राहणार नाही, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आशा व्यक्त केली.

सामाजिक सलोखा व सद्भाव वाढीस लागावा यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली परभणीत सद्भावना पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते आ. सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री नितीन राऊत, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, खा.डॉ. कल्याण काळे, खा.रविंद्र चव्हाण, माजी मंत्री सुरेश वरपुडकर, रमेश बागवे, काँग्रेस सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, परभणी शहर जिल्हाध्यक्ष नदीम इनामदार, प्रदेश सरचिटणीस संघटन व प्रशासन अॅड. गणेश पाटील, मोहन जोशी, तुकाराम रेंगे पाटील, प्रदेश सरचिटणीस ब्रिज दत्त, ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४९.०० क्विंटल | २,५१० | ३,००१ | २,७३७ |
| ज्वारी/हायब्रिड: १७६.०० क्विंटल | १,७५१ | २,७४० | २,२५७ |
| मका/लोकल:३.५० क्विंटल | २,०७५ | २,०७५ | २,०७५ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,४०१ | ६,६०० | ६,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६८.५० क्विंटल | २,००१ | २,८०१ | २,४५४ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: १४.०० क्विंटल | ५,४०१ | ५,४२० | ५,४१० |

## अग्रलेख

# महायुतीच्या नेत्यांची घुमवाघूमवी

विधानसभा निवडणुकीदरम्यान महायुतीने आश्वासनांचा अक्षरश: पाऊस पाडला. राज्याच्या तिजोरीच्या आवाक्या बाहेरच्या घोषणा करताना लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफी, कृषी वीज बिल माफी, एसएमपीच्या २० टक्के प्रोत्साहन देऊन शेतमालाची खरेदी, शेतकरी सन्मान योजनेत निधी वाढ अशा एकापेक्षा एक शक्य न होणाऱ्या घोषणा केल्या. आता मात्र उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित दादा कर्जमाफीची घोषणा मी केली होती का? असा प्रश्न विचारत आहेत. अजित पवार यांच्यासह महायुतीचे इतर नेतेही अशाच पद्धतीने घूमवाघूमवी करीत असल्याचे त्यांच्या वेगवेगळ्या वक्तव्यावरून दिसत आहे.

अलीकडेच मंत्री नरहरी झिरवाळ यांनी लाडकी बहीण योजनेचा हप्ता २१०० करू असे कोण म्हणाले होते? अशा आशयाचे वक्तव्य केले होते. याचकाळात मंत्री आदिती तटकरे यांनी ज्या महिला शेतकरी सन्मान योजनेचे हजार रुपये मिळवतात त्यांना लाडकी बहीण योजनेत वरचे केवळ ५०० रुपयेच मिळतील असे सांगून सरकारने तसा निर्णय घेतला असल्याचे जाहीर केले आहे. म्हणजे राज्यातील खूप मोठ्या वर्गाच्या हातून एक हजार रुपये कमी झाले आहेत. राज्य सरकारने आवाक्या बाहेरची ही योजना जाहीर करतानाच याचा विचार का केला नाही? शेतकरी सन्मान निधी हा वेगळ्या कारणासाठी दिला जातो. लाडकी बहीण योजनेचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. राज्यातील महिलांना ॲनिमियाचा होणारा त्रास लक्षात घेऊन त्यांनी स्वत:च्या आहार आणि आरोग्यासाठी खर्च करावा म्हणून राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेच्या मूळ उद्देशात महिलांना हा निधी जर याच कारणासाठी दिला जात असेल तर त्याचा शासन शेतकरी सन्मान योजनेत आणि शेती विकासासाठी देत असलेल्या निधीशी कसा काय संबंध येऊ शकतो? मात्र आर्थिक बोजा वाढल्यामुळे सरकार त्यातून सुटण्यासाठी कसेही उलट सुलट निर्णय घेत आहे. त्याबद्दल कोणीही आक्षेप घ्यायला तयार नाही हे विशेष. शासनाचा एखादा कार्यक्रम गुंडाळलाच असेल तर त्याबद्दलचा निधी न मिळणे हे कदाचित योग्य म्हणता येईल. पण, जे कार्यक्रम सुरू आहेत त्यात दोन कार्यक्रमांची एकमेकांमध्ये गल्लत करून निधी कपात करणे हे कोणत्याही प्रकारे समर्थनीय ठरू शकत नाही. याबद्दल सरकारला जाबच विचारला गेला पाहिजे.

महायुती सरकारमध्ये सामील असणाऱ्या देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजितदादा यांच्या पक्षांनी जाहीरनाम्यात शेती कर्जमाफीचा मुद्दा ऐनवेळी आणला होता. त्यांचे जाहीरनामे, भाषणे, पत्र परिषदा यागोष्टींची साक्ष आहेत. तरीही उपमुख्यमंत्री अजितदादांनी, पत्रकारांच्या प्रश्नावर कर्जमाफीचे आश्वासन मी दिले होते का? असे विचारले. ज्या घोषणेवर सत्ता मिळवली ते दादा विसरले का? २९ तारखेला आवाहन करताना ३१ मार्चला लोकांनी आपले थकीत कर्ज फेडावे, असे आवाहन दादांनी केले होते. लोकांना तो पहिला धक्का होता. राज्यभरातील शेतकरी कर्जमाफी मिळणार म्हणून थांबला होता. ऐनवेळी दादांनी केलेल्या त्या वक्तव्याने अनेक शेतकऱ्यांच्या समोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. कर्जमाफी हा राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उतारा नाही हे मान्य असले तरी राज्यकर्त्यांनी मत मागताना आपल्याला हे अंतिम उत्तर नाही याची जाणीव असताना ते आश्वासन का दिले? याचा खुलासा केलेला नाही. शेतकऱ्यांना शेतमाल खरेदी करताना २० टक्के अधिकची रक्कम देण्याची घोषणा सरकारने केली आहे. त्याची तरी अंमलबजावणी होणार का? कारण, सरकार खरेदीला उतरते त्या काळात दर पडतो किंवा खरेदीसाठी सरकारकडे बारदाना सुद्धा उपलब्ध नसतो. केवळ त्या कारणासाठी राज्याची खरेदी थांबते आणि बारदान खरेदीचे टेंडर काढण्याची दोन महिन्यांची प्रक्रिया सुरू होते. तोपर्यंत शेतकरी कोलमडून पडतो. त्याच्याकडून थकीत कर्ज आणि वीज बिल भरण्याची सरकार अपेक्षा तरी कशी ठेवते? प्रत्येक वेळी बाजारपेठेत केलेला अनावश्यक हस्तक्षेप आणि मालाचे दर पडत असताना घेतलेली बघ्याची भूमिका किंवा केवळ आश्वासनांचा पाऊस हे शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे एक प्रमुख कारण आहे. अशावेळी कर्जमाफी हाच एक उपाय नाही असे सांगत राहणे अन्याय करणारे आहे. पुण्यातील अर्बन डायलॉग कार्यक्रमात अर्थसंकल्पात ठरलेल्या कामांवरच निधी खर्च झाला पाहिजे, असे फडणवीस म्हणाले. पण या अर्थसंकल्पात सरकारने निवडणुकीत केलेल्या घोषणांसाठी निधी आहे का? चार-पाच महिने राज्यातील सरकारी पण कंत्राटी नोकरांचे पगार थांबले आहेत. ते होणार का? आणि ही शिस्त कशी लागणार? यावर मात्र कोणीही भाष्य केलेले नाही. म्हणजे आपणच जाहीर केलेल्या सवलती किंवा आणखी काही म्हणा तेच महायुतीचे नेते सोयीस्करपणे विसरत आहेत. नेत्यांची ही घूमवाघूमवी जनता उघड्या डोळ्याने पाहत आहे.



पाटोदा : नगरपंचायत अंतर्गत रमाई आवास योजनेतून २१० घरकुल मंजूर करून दिल्याबद्दल समाजबाधवाच्या वतीने बहुजन नायक आमदार सुरेश आण्णा धस याचा तथागत गौतम बुद्ध यांची मुर्ती व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सभापती किशोर अडागळे डॉ नरेंद्र जावळे .शकर जाधव . .चेतन जावळे.सुरज जावळे .निखील अडागळे व समाजबाधव मोठ्या प्रमाणात उपस्थितीत होता

## जिजामाता महिला मंडळच्या वतिने श्रीराम कथा सोहळ्याचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी

**शहरात जिजामाता महिला मंडळ गेवराई यांच्या वतिने भव्य दिव्य संगीतमय श्रीराम कथा चे आयोजन करण्यात आले आहे. या श्रीराम कथे चे प्रवक्ते रामायणाचार्य ,ह.भ.प. प्रकाश महाराज साठे धारुरकर यांची कथा होणार असुन या कथेचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिजामाता महिला मंडळ गेवराई यांनी केले आहे.**

गेवराई शहरात जिजामाता महिला मंडळ गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत असून महिलांसाठी त्यांचे सामाजिक उपक्रम सातंत्याने सुरु असतात. यावर्षी प्रथमच जिजामाता महिला महामंडळाच्या वतीने भव्य श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे. कथा प्रवक्ते रामायणाचार्य, ह.भ.प. प्रकाश महाराज साठे धारुरकर यांची कथा प्रारंभ दि.०७ मे २०२५ बुधवार रोजी तर सांगता ११ मे २०२५ रविवार रोजी वेळ दुपारी ०४ वा ते सायं ०७ वाजता ताकडगाव रोड बाळराजे नगर गेवराई शारदा शाळेच्या पाठीमागे होणार असुन याकथेचा तालुक्यातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिजामाता महिला मंडळ गेवराई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नामदेव महाराज शास्त्री यांचे बडेवाडीत बुधवारी आशिर्वचन

दिंद्रुड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील बडेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला बुधवारी सुरूवात होत आहे.या निमित्त श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ. न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या आशीर्वचन कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी सायंकाळी करण्यात आले आहे.**



बडेवाडी येथे मागील काही वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताह तथा ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण,श्रीमद भागवत कथा व किर्तन महोत्सवाचे आयोजन वैशाख महिन्यात करण्यात येते. या धार्मिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत ह.भ.प.डॉ. नामदेव महाराज शास्त्री बुधवारी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त बडेवाडी आशीर्वचन कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत,नित्रुड येथून डॉ.नामदेव शास्त्री यांची मिरवणूक होणार आहे. भाविक भक्तांची सायंकाळी ४ वाजता पायी पदयात्रा टाळ मृदंगाच्या निनादात काढण्यात येईल. सायंकाळी ६ वाजे दरम्यान बडेवाडी येथे भाविक भक्तांना डॉ.नामदेव महाराज शास्त्री आशीर्वचन देतील. या कार्यक्रमानंतर रात्रौ ९ वाजता विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संत भगवान बाबा तरुण मित्र मंडळ व समस्त गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची विजयनगर( वैतागवाडी) येथील अखंड हरिनाम सप्ताह व भुवनेश्वर गोशाळेस सदिच्छाभेट

बीड । प्रतिनिधी

**नेकनूर पासून जवळच असलेल्या विजयनगर वैतागवाडी, येथील वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह व शिव उपासक महंत बाळनाथ महाराज डीसले यांच्या भुवनेश्वर गोशाळेला बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके साहेब यांनी काल दिनांक ३/५/२५ रोजी सदिच्छा भेट दिली व गोशाळेच्या चारा ,पाणी, आणि निवारा या विषयावर व गो पालनासाठी येणाऱ्या समस्या, अडचणीवर सविस्तर चर्चा केली. या चर्चेदरम्यान त्यांनी महंत बाळनाथ महाराज यांना आश्वासन दिले की मी माझ्या परीने या गोशाळेस सर्वपरी सहकार्य व आपल्या गोशाळेला येणाऱ्या अडचणी या शासनापर्यंत पाठपुरावा करून त्या सोडवण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले.**

महंत शिव उपासक डीसले महाराज यांच्याकडे गोशाळेत आज जवळ जवळ ६५ गाई आहेत .यामधील या गाई लोकांनी स्वखुशीने आणून सोडलेल्या आहेत असे महाराजांनी तहसीलदार यांना सांगितले . या गोवत्सपालनासाठी आपण जास्तीत जास्त भरीव निधीची मदत करू असे आश्वासन तहसीलदार यांनी देताच सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. यावेळी विजयनगर वैतागवाडी येथील ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी तहसीलदार साहेब यांचा गोपालक भुवनेश्वर संस्थांचे हभप महंत बाळनाथ महाराज डीसले यांनी शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार केला.




# वंजारवाडीच्या मयत वारसांना आणि जखमींना अर्थसहाय्य मंजूर करावे

## मुख्यमंत्र्यांकडे आ.सुरेश धस यांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातील मजूर महिला पुरुष आणि बालकांसह वंजारवाडी येथून कडा येथे जात असताना सकाळी १०.५० या वेळी देवीनिमगाव या गावाजवळ हे पिकअप वाहन टायर फुटल्याने उलटले दोन तीन पलट्या झाल्या या अपघातामध्ये अजित विठ्ठल महाजन वय १४ वर्षे, कु.श्रावणी विक्रम महाजन वय १३ वर्षे, आणि कु.ऋतुजा सतीश महाजन वय १६ वर्षे यांना जबर मार लागल्याने ते मयत झाले तर २० जखमी झाले.कामगार दिनी रस्ता अपघातामध्ये मयत झालेल्या ३ मजुरांच्या वारस कुटुंबियांना आणि जखमी मजुरांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी द्वारे अर्थसाह्य मंजूर करावे अशी मागणी पत्राद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आष्टी,पाटोदा,शिरूर मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी केली आहे.**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील.. वंजारवाडी ता.आष्टी जि.बीड येथील महिला, पुरुष हे मजूर दि.१ मे २०२५ रोजी आपल्या मुलांसह कांदा भरण्यासाठी श्री. दिलीप विलास महाजन यांच्या पिकअप वाहन क्र.एम.एच.-१- एल- २६८५ या वाहनाद्वारे..वंजारवाडी येथून कडा येथे जात असताना सकाळी १०.५० या वेळी देवी निमगाव या गावाजवळ हे पिकअप वाहन उलटले..दोन तीन पलट्या झाल्या या अपघातामध्ये.. अजित विठ्ठल महाजन वय १४ वर्षे, कु.श्रावणी विक्रम महाजन वय १३ वर्षे, आणि कु.ऋतुजा सतीश महाजन वय १६ वर्षे यांना जबर मार लागल्याने ते मयत झाले असून कु पल्लवी सतीश महाजन, शकुंतला सूर्यभान नरवडे, आशाबाई पोपट नरवडे, गीताबाई आजिनाथ नरवडे अर्चना नितीन नरवडे, कांताबाई ज्ञानदेव महाजन, स्वाती दिलीप महाजन, शांताबाई नरवडे, अंकिता बन्सी नरवडे, नंदा नितीन नरवडे, संगीता अशोक महाजन, आशाबाई बाळू महाजन, द्वारकाबाई बबन महाजन, वैष्णवी बाळू नरवडे, सुलाबाई पोपट महाजन, शीतल पोपट नरवडे, मनीषा शिवनाथ गोरे, धोंडाबाई नितीन नरवडे, सिंधुबाई ज्ञानदेव महाजन, श्रावणी दिलीप महाजन, आणि राजश्री विठ्ठल महाजन सर्व रा.वंजारवाडी ता.आष्टी जि.बीड हे जखमी झाले आहेत हे सर्व मजुरी करणाऱ्या वर्गातील ग्रामस्थ असून जबर जखमी झाल्यामुळे काम करता येणार नसल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणी येणार आहेत..कामगार दिनी झालेल्या अपघातामधील मयत ३ व्यक्तींच्या वारस कुटुंबियांना आणि २० जखमी झालेल्या मजूर नागरिकांविषयी अत्यंत सहानुभूतीपूर्वक विचार होऊन त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीद्वारे अर्थसहाय्य मंजूर करण्यात यावे..या साठी जिल्हाधिकारी,बीड यांच्या मार्फत प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून अर्थसहाय्य मंजूर करावे अशी विनंती आ.सुरेश धस यांनी केली आहे.

## ॲड.जगन्नाथराव औटे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

**जिल्हा वकील संघाचे ज्येष्ठ सदस्य तथा स्वातंत्र्य सेनानी सामाजिक क्षेत्रातील एक अलौकिक नाव अडवोकेट जगन्नाथराव रंगनाथराव औटे यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी काल दिनांक ४ मे रोजी काल १२ वाजता सुमारास दु:खद निधन झाले. आहे. पाचंग्री या छोट्याशा गावी त्यांचा जन्म झाला होता प्राथमिक शिक्षण जातेगाव येथे झाले तर विधी शिक्षण हे हे पुणे येथे झाले होते मराठा बोर्डिंग तेथे विद्यार्थी होत त्यांनी स्वातंत्र्य सैनिक म्हणून सुद्धा स्वातंत्र्यपूर्वकाळात भारत देश स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठे योगदान**



काल दि.४ मे रोजी सायं. ७ वाजता भगवान बाबा प्रतिष्ठान जवळील स्मशानभूमीत बार्शी रोड येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. बीड जिल्हा न्यायालयात एक जेष्ठ विधीज्ञ म्हणून जवळपास ६० वर्षापेक्षा जास्त वकिली केली आहे त्यांच्या सेवेबद्दल महाराष्ट्र अँड गोवा बार कौन्सिलने त्यांचा सीनियर अडवोकेट्स म्हणून माननीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव केला होता. बीड जिल्हा न्यायालय वकील संघ यांच्या जडणघडणीत त्यांचा मोठा सिंहाचा वाटा आहे ते एक चालते बोलते विद्यापीठ होते त्यांनी असंख्य वकिलांना मार्गदर्शन केले आहे व त्यांचे काही ज्युनिअर आज न्यायिक पदावर काम करत आहेत. नुसते वकील व्यवसायावर नाही तर त्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून व सर्वांना शिक्षण महत्त्वाचे बाब आहे यासाठी शिक्षण संस्थेमध्ये स्थापनेपासून काम केलेले आहे बीड शहरातील नावाजलेले नारायण गड शिक्षण संस्था या संस्थेचे ते अध्यक्ष होत तसेच विवेकानंद शिक्षण संस्थेचे ते संचालक आहे त्यांनी त्यांच्या जीवनात एक कडवा शेतकरी कामगार कष्टकरी गरीब पीडित अन्यायग्रस्त यांच्याकरिता ते नेहमी धवन जात असत अनेक राजकीय सामाजिक संस्थांचे त्यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे ते एक कुटुंबात्सल व सर्व ज्युनिअर वकिलांचे आवडते काका या नावाने ते सर्वपरिचित होते ते वकील संघाचे माजी अध्यक्ष सुद्धा राहिलेले आहेत त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत अशा या थोर स्वातंत्र्यसेनानी यांची आज प्राणज्योत मावळली मृत आत्म्यास शांती लाभो ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले वकील संघाचे माजी अध्यक्ष एडवोकेट हेमंत उर्फ बप्पा औटे जयंत दोन मुली जावई नातवंडे असा परिवार आहे.

## पान १वरून...

### शेतकऱ्यांनी 'एचटीबीटी'

अडचणी आल्यास खरेदी बिले नसल्याने कृषी विभागाकडे तक्रार करता येणार नाही. याशिवाय ग्राहक मंचात तक्रार स्वीकारली जात नाही.पुढे नुकसान भरपाई मिळणार नाही,याची काळजी घ्यावी,असे आवाहन गुणनियंत्रण विभागाने केले आहे.

---------

### मविआकडून अजितदादांना

विनायक राऊत यांनी मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली असून त्यासाठी अट काय आहे, हे सुध्दा सांगितले आहे. त्यामुळे खरंच अजित पवार वेगळा निर्णय घेणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनेकदा मुख्यमंत्रिपदाबाबत वक्तव्य केले आहेत. त्यातून त्यांची मुख्यमंत्रिपदाची इच्छा देखील दिसून येते, दरम्यान त्यांनी पुन्हा एकदा दोन मे रोजी मुख्यमंत्रिपदासंदर्भात एक वक्तव्य केले होते, त्यामुळे ते चर्चेत आले. 'मुख्यमंत्रिपदासाठी योग जुळून यावा लागतो. कारण मलाही गेल्या अनेक वर्षांपासून वाटतं की मी मुख्यमंत्री व्हावं. पण कुठे जमतंय, असे अजित पवार यांनी म्हटले होते. दरम्यान अजित पवार यांच्या या वक्तव्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी अजित पवार यांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. ते रत्नागिरीमध्ये बोलत होते.

---------------

### मुंडेंकडून १८ तुकडे

मुंडेंनी मला १८ तुकडे करण्याची धमकी दिली आहे. माझ्याविरोधात अजूनही हिंसा सुरुच आहे, यासंदर्भात तक्रार कोर्टात दिली आहे. याबाबत व्हॉट्सअॅप चॅट, एनसी देखील पुरावे देखील कोर्टात दिले आहेत, पोलिस तक्रार दाखल करतात. मात्र काही करत नाही. दबावतंत्र धमकी देण्याचे काम करत आहे, बहिणीवर बोलत आहे, म्हणून मला धनंजय मुंडेंनी धमकी दिली असल्याचे देखील करुणा शर्मा यांनी सांगितले आहे.

---------------

### १२८ वर्षीय योगगुरू

एका भिक्षू ब्राह्मण गोस्वामी कुटुंबात झाला. सध्या हे ठिकाण बांगलादेशात आहे. त्याचे आईवडील भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करत होते. वयाच्या चौथ्या वर्षीशिवानंद बाबांच्या पालकांनी त्यांना नवद्वीप येथील रहिवासी बाबा ओंकारानंद गोस्वामी यांच्याकडे सोपवले. त्यांच्या प्रेरणेने त्यांनी आयुष्यभर ब्रह्मचर्य व्रताचे पालन केले. बाबा शिवानंद यांनी आयुष्यभर योगाभ्यास केला. ते कुठेही राहिले तरी निवडणुकीच्या दिवशी वाराणसीला येऊन आपला हक्क बजावण्यास कधीही विसरले नाहीत. या वर्षाच्या सुरुवातीला ते प्रयागराज महाकुंभात पोहोचले होते आणि पवित्र संगमात पवित्र स्नान केले होते. योगगुरू बाबा शिवानंद यांचे निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे.

----------------

### मी नव्हतो, पण मी काँग्रेसच्या

काळात नाकारले गेले.'' १९८४ च्या दंगलीप्रकरणी दोषी ठरवण्यात आलेले माजी काँग्रेस नेते सज्जन कुमार यांचा उल्लेख करत तो म्हणाला, अजूनही असे अनेक सज्जन कुमार काँग्रेसमध्ये बसले आहेत. तुम्ही आम्हाला बीजेपीचे भय दाखवता, पण स्वतः शीख समाजाशी संवाद साधण्याचा प्रयत्न का करत नाही? जर हेच सुरू राहिले तर पंजाबमध्ये बीजेपीला मोकळं मैदान मिळेल.'' राहुल गांधींनी उत्तर देताना स्पष्ट केले की, ''मी असे मानत नाही की शीख समाजाला काही गोष्टींचे भय आहे. माझे विधान हे होते की, भारतात लोकांना आपला धर्म मानताना अडचण का वाटावी? १९८० च्या दशकात जे काही घडले, ते चुकीचे होते. मी हे सार्वजनिकरित्या आधीही मान्य केले आहे. मी अनेक वेळा सुवर्ण मंदिरात गेलो आहे आणि भारतातील शीख समुदायाशी माझे चांगले संबंध आहेत.'' अनेक चुका ज्या काळात घडल्या, जेव्हा मी तिथे नव्हतो, पण तरीही काँग्रेस पक्षाने इतिहासात केलेल्या प्रत्येक चुकीची जबाबदारी घ्यायला मी तयार आहे.

**ऑपरेशन ब्लू स्टार आणि दंगल**

१९८० च्या दशकात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली पंजाबमधील फुटीरतावादी चळवळीला दडपण्यासाठी १ जून ते १० जून १९८४ या काळात ऑपरेशन ब्लू स्टार राबवण्यात आले. जर्नेल सिंह भिंद्रनवाले आणि इतर दहशतवाद्यांनी अमृतसरच्या गोल्डन टेम्पलमध्ये आश्रय घेतला होता. तेथेच भारतीय लष्कराने कारवाई केली. या कारवाईत अकाल तख्तचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, ज्यामुळे शीख समुदायात तीव्र नाराजी निर्माण झाली. या घटनेनंतर काही महिन्यांनी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधी यांची त्यांच्या शीख अंगरक्षकांनी हत्या केली. त्यानंतर देशभरात शीखांविरोधात हिंसाचार उसळला. सरकारी आकडेवारीनुसार, दिल्लीसह इतर ठिकाणी ३००० पेक्षा अधिक शीखांची हत्या झाली.

------------

### भारताचा पाकिस्तानवर वॉटर स्ट्राईक सुरूच,

ठरला आहे. भारताने सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर आता चिनाब नदीचे पाणी बागलीहार धरणाद्वारे रोखण्याचा निर्णय घेतला आहे. भारताने जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ही कारवाई केली आहे. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर भारताने १९६० पासून सुरू असलेली आणि जागतिक बँकेच्या मध्यस्थतेत झालेली सिंधू पाणी वाटप करार रद्द केला आहे. जम्मूच्या रामबनमध्ये असलेल्या बागलीहार प्रकल्पातील पाण्याचे वहन नियंत्रित करण्याची भारताकडे क्षमता आहे. तसंच, झेलम नदीवर असलेल्या किशनगंगा प्रकल्पासंदर्भातही भारत लवकरच कडक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.

----------

### सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्याच्या

न्याय विभागातील काही घटकांमध्ये राबवली जात आहे. त्यामुळे थोडाफार निधी आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि महिला व बाल कल्याण विभाग यांच्याकडून घेतला गेला असेल, तर त्यात चुकीचे काही नाही, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. बावनकुळे म्हणाले, जेव्हा एखादी योजना राबवायची असते, तेव्हा ती राज्य सरकारच्या निर्णयाने राबवली जाते. विभाग वेगळे असले तरी निर्णय सामूहिक असतो. मी स्वतः संजय शिरसाट यांच्याशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

--------

### नवा अवतार राक्षसरुपी भाजपाचे

रामचंद्र दळवी, मुजाहिद खान, केदार साळुंके, बाळासाहेब देशमुख, अभय देशमुख यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी पोखर्णी येथे नृसिंहाचे दर्शन घेऊन सद्भावना पदयात्रेची सुरुवात झाली. यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राज्यात सामाजिक तेढ निर्माण करण्याचे काम केले जात आहे. परभणीतही अशाच एका घटनेने या भागात सामाजिक द्वेष पसरवण्याचा प्रकार झाला. राज्यातील सामाजिक तणाव कमी करण्याच्या हेतूने व सद्भावना आणि सौहार्द निर्माण करण्यासाठी ही काँग्रेस पक्षाने पदयात्रा आयोजित केली आहे. याआधी बीड जिल्ह्यात मस्साजोग ते बीड, नागपूर आणि नाशिकमध्ये सद्भावना पदयात्रा काढण्यात आली तर शनिवारी परळीत सद्भावना सत्याग्रह करण्यात आला आणि आता परभणीत सद्भावना यात्रा काढली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गट नेते सतेज ऊर्फ बंटी पाटील म्हणाले की सत्ताधारी लोक राजकीय फायद्यासाठी सामाजिक वातावरण बिघडवत असताना काँग्रेस पक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्त्वाखाली सद्भावना व सौहार्द वाढवण्याचे काम करत आहे. जनतेला लुबाडून उद्योगपती आणि ठेकेदारांची घरे भरण्याचे काम सुरु आहे. ठेकेदारांच्या फायद्यासाठी शक्तीपीठ महामार्गाच्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी हडपण्याचा सरकारी डाव आहे पण काँग्रेस तो यशस्वी होऊ देणार नाही. सद्भावना यात्रेच्या सकाळच्या सत्रात ८ किलोमीटर तर दुपारच्या सत्रात ८ किलोमिटर पदयात्रेचा कार्यक्रम झाला. संध्याकाळी माहेर मंगल कार्यालय येथे मुक्काम आणि सोमवारी ५ मे रोजी परभणी शहरात महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान बचाव यात्रा व अक्षता मंगल कार्यालयात संविधान संमेलन संपन्न होणार आहे.

---------------

### शिवसेना पक्ष ठाकरेंचा

पुढची तारीख मिळणार की अंतिम फैसला होणार याबाबत उत्सुकता असणार आहे.

-----------

# पती-पत्नीला मारहाण करून सोने लुटले

जालना । प्रतिनिधी

तीर्थपुरी सिद्धेश्वर पिंपळगाव रोडवरील शेती करण्यासाठी पती-पत्नी राहतात शनिवारी मध्यरात्री दोन अज्ञात चोरट्यांनी पती-पत्नीला जबर मारहाण करून पत्नीच्या नाकातील कानातील गळ्यातील सोनू लंपास केलं. यामध्ये पत्नीचे दोन बोट तोडण्यात आले तसेच पतीला गळ्यावर वार करण्यात आले. याबाबत थोडक्यात माहिती अशी की. बिबनभाई पठाण वय ६० वर्षे राहणार खापरदेव हिवरा तालुका घनसावंगी हे दोघेजण २५ ते ३० वर्षापासून शेती करतात या दोघांनाही शनिवारी रात्री धारदार शास्त्राने मारहाण करून जखमी केले व पत्नीच्या नाकातील गळ्यातील कानातील सोन ं काढून घेऊन त्यांना बेदाम मारहाण केली याप्रकरणी दोघांवर एका खाजगी दवाखान्यामध्ये उपचार सुरू आहे. याप्रकरणी तीर्थपुरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी घटनेस स्थळे जाऊन घडलेल्या घटनेचा पंचनामा केला.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ०५ मे २०२५



# जन्म आणि मृत्यू यामधील अंतर म्हणजे गिर्यारोहण - अनिता घाटगे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुलींनी गिर्यारोहण क्षेत्रामध्ये आपले करिअर केले पाहिजे असे मत प्रसिद्ध गिर्यारोहक अनिता घाटगे यांनी व्यक्त केले येथील योगेश्वरी शिक्षण संचालित योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी व श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीरात गिर्यारोहण भ्रमंती - एक विलक्षण अनुभव या विषयावर त्या बोलत होत्या.

पुढे त्यांनी उपस्थित शिबिरार्थींशी संवाद साधताना, त्यांचे गिर्यारोहण क्षेत्रातील अनुभव, तसेच मुलींनी समाजामध्ये भान जागृत ठेवून कसे वागले पाहिजे, यावर आपले विचार व्यक्त केले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांची पाचवर्षीय गिर्यारोहक मुलगी, अन्वीने गिर्यारोहण क्षेत्रामध्ये विविध शिखरे सर करून भारत देशासाठी प्रस्थापित केलेल्या विश्वविक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. अन्वि हिने जी शिखरे सर केली, त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील सर्वाधिक उंचीचे कळसुबाई तसेच दक्षिण भारतातील मेसापूला माला, दोडाबेट्टा व हिमालयातील केदारकंठा या शिखरांचा समावेश आहे. पाच वर्षीय अन्वी हिला द यंगेस्ट माउंटेनर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



यावेळी त्यांनी मुलींना मार्गदर्शन करताना विविध विषयांवर आपली मते व्यक्त केली. मुलींना सल्ला देताना त्यांनी सांगितले की, आपण स्वतः समृद्ध होणे, कुटुंब आणि समाज समृद्ध करणे म्हणजे आत्मभान जागृत करणे होय. मन, मनगट आणि मेंदू विकसित करणे ही काळाची गरज आहे. आपण एकमेकांना माणूस म्हणून समजून घेतले पाहिजे. आपण इतरांच्या सामर्थ्य, कौशल्य, बुद्धीचा सन्मान केला पाहिजे.आपण आपल्या स्व ची ओळख करून घेतली पाहिजे. लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन आपण आपलं अस्तित्व निर्माण केलं पाहिजे. साहसाचे दुसरे नाव म्हणजे मुलगी आहे. गिर्यारोहण क्षेत्रामध्ये आपल्या शारीरिक व मानसिक क्षमतेचा कस लागतो. मुलींनी गिर्यारोहण क्षेत्रामध्ये आले पाहिजे. गिर्यारोहण म्हणजे पर्वत, डोंगर, सर करणे होय. जन्म आणि मृत्यू यामधील अंतर म्हणेज गिर्यारोहण होय. गिर्यारोहण हा महाराष्ट्राचा मूळ खेळ आहे. या गिर्यारोहणामध्ये शिवाजी महाराजांचे मावळे प्रवीण होते. स्वराज्य निर्मितीमध्ये या मावळ्यांच्या साहसाचा मोठा वाटा होता. मुलीनी खेळांमध्ये करियर केले पाहिजे. आपल्या आयुष्यामध्ये आपल्या ध्येयाकडे वाटचाल करत असताना अनेक मोहाचे क्षण येतील. पण आपले ध्येय साध्य करण्यासाठी आपण हे मोहाचे क्षण ओळखून त्यापासून दूर राहिले पाहिजे. आपण आपल्या मनावर नियंत्रण ठेवले पाहिजे. सौंदर्याला जर कर्तृत्वाची जोड नसेल तर ते मनोरंजनाचे साधन बनते. आपले सौंदर्य हे आपल्यासाठी शाप ठरू नये याची काळजी मुलींनी घ्यावी असे आवाहन त्यांनी मुलींना केले. सोशल मिडियाच्या माध्यमातून अनेक मुली प्रलोभनांना, अमिषाला बळी पडतात. यापासून मुलींनी दूर राहिले पाहिजे. चांगली पुस्तके वाचणे, निसर्गामध्ये भ्रमंती करणे या गोष्टी आपल्याला वाईट गोष्टीपासून दूर ठेवतात. आठवड्यातून एकदा तरी जंगलाची भ्रमंती केली पाहिजे. आर्थिक विषमता देशाच्या प्रगतीला मागे घेऊन जाते. त्यामुळे आपली गरज पूर्ण झाल्यानंतर आपण इतरांची मदत केली पाहिजे. आपले रक्षण करण्याची शक्ती, सामर्थ्य, क्षमता स्त्रीमध्ये निर्माण करणे हे काम या शिबिरातून होणार आहे. आपले आयुष्य हे गिर्यारोहनासारखेच आहे. गिर्यारोहणामध्ये जसे अनेक आव्हाने असतात, तशीच आव्हाने आपल्या आयुष्यामध्ये असतात. या आव्हानांवर आपण विजय मिळवला पाहिजे.अध्यक्षीय समारोपात योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जी. बी.व्यास यांनी दोन गीते गाऊन आपल्यामध्ये माणुसकीचा झरा जिवंत ठेवला पाहिजे असा संदेश उपस्थितांना दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूजा पडगी यांनी केले तर आभार प्रा.राणी गोवंदे यांनी मानले. याप्रसंगी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी,क्रीडा प्रबोधिनी सदस्य, शिबिरार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगेश्वरी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## चौसाळा येथील वाहतूक नियंत्रक कचरू बोबडे यांचा सेवापूर्ती सत्कार

**चौसाळा । प्रतिनिधी**


बीड आगारातील चौसाळा तालुका बीड येथील, वाहतूक नियंत्रक कचरू पंढरीनाथ बोबडे हे नुकतेच एस टी महामंडळाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा चौसाळा येथील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आली

सन १९८९ मध्ये कचरू बोबडे हे वाहक म्हणून आष्टी आगारात नियुक्त झाले त्यानंतर त्यांनी पाटोदा येथे काही काळ वाहक पदावर काम करून नंतर मार्ग तपासणी या पदावर काम केले २०१७ मध्ये ते चौसाळा येथे वाहतूक नियंत्रक या पदावर काम करून आज रोजी ३६ वर्ष सेवा करून सेवानिवृत्त झाले ते सेवानिवृत्त झाल्यामुळे चौसाळा तील पत्रकार एनटी वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत व काही मान्यवरांच्या हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले या सत्कार समारंभ पत्रकार बळीराम राऊत विकास सर्वज्ञ राम आंधळे चालक अंकुश बोबडे सचिन शिंदे योगेश भवर वैभव सर्वज्ञ आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा प्रथम क्रमांकाचे पाडळी हायस्कूलला दोन लाखाचे बक्षीस प्राप्त

**शिरूर का । प्रतिनिधी**

राज्यात मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा अभियान प्रभावीपणे राबविले गेले यामध्ये अनेक शाळांनी सहभाग घेऊन आपली कला कौशल्य दाखविले त्याच अनुषंगाने शिरूर तालुक्यातून पाडळी हायस्कूल पाडळी या शाळेला मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे दोन लाखांचे बक्षीस मिळाले होते आज महाराष्ट्र दिनी या बक्षिसांची रक्कम रोख चेकद्वारे मुख्याध्यापक तथा प्राचार्य अंगदराव दहिफळे सरपंच गहीनाथ पाखरे यांना गटविकास अधिकारी संजय केंद्रे गटशिक्षणाधिकारी संदीप शिंदे विस्तार अधिकारी शेख जमीर यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आली मुख्याध्यापक तथा प्राचार्य दहिफळे यांनी अत्यंत मेहनतीने



वर्षभर शाळेत वृक्षारोपण शाळा रंगरंगोटी बोलक्या भिंती म्हणी सुविचार थोर महापुरुषांची प्रतिमा विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा आनंदी वातावरणात शिक्षण शाळा स्वच्छता विविध स्पर्धा मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग आदि बाबींचे योग्य नियोजन करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले या बक्षीस कार्यक्रमास केंद्र प्रमुख सुनील खेडकर उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोंडगे माध्यमिक पर्यवेक्षक दिपक रत्नपारखी आण्णा राऊत मारुती धांडे महेश उगलमुगले आदींची उपस्थिती होती प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्तजी क्षीरसागर प्रशासक डॉ . राजिवजी मचाले सहप्रशासक योगेश पवार कार्यवाहक एम ए राऊत आदींनी व ग्रामस्थांनी प्राचार्य दहिफळे यांचे अभिनंदन केले .

# पंतप्रधान पिक विमा योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्यात कृषी पिक विमा महामंडळाची स्थापना करावी -नामदेव सानप

बीड । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समृद्ध शेतकरी आणि संरक्षित शेती या उद्देशाने केंद्र सरकार द्वारे २०१५-१६पासून सुरू केलेल्या पंतप्रधान कृषी पिक विमा योजनेत राज्य सरकार मधील चाणक्यांनी व कृषी खात्याच्या झारीतील शुक्राचार्यांनी कृषी विमा कंपन्यांबरोबर संगनमत करून शेतकऱ्यां ऐवजी विमा कंपन्यांचे हित साध्य करणारे नियम करून एकिकडे एका दशकात विमा कंपन्या कोट्याधीश केल्या तर दुसरीकडे शेतकरी कंगाल केला. याला सर्वस्वी जबाबदार तत्कालिन राज्य सरकार व त्यांच्या सुरात सूर मिसळणारा राज्य कृषी विभाग जबाबदार आहे.शेतकर्यासाठी आधारवड ठरलेली केंद्र सरकारची मुळ पंतप्रधान पिक विमा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात आयुर्विमा महामंडळा प्रमाणे महाराष्ट्र राज्य कृषी पिक विमा महामंडळाची स्थापना करुन पंतप्रधान पिक विमा योजनेचा मुळ उद्देश सफल करण्यात यावा, अशी मागणी प्रा. डॉ.नामदेव सानप यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.



या संदर्भात प्रा.डॉ. नामदेव सानप यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकर्यांसाठी आधारवड ठरणारी व कृषी पिकांना आर्थिक संरक्षण देण्याची क्षमता असणारी पंतप्रधान कृषी पिक विमा योजना केंद्र सरकार द्वारे २०१५-१६ पासून सुरू केली. या योजनेला प्रचंड प्रमाणात प्रतिसाद देशातील शेतकऱ्यांनी दिला.

केंद्र सरकारच्या मुळ पंतप्रधान कृषी पिक विमा योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होऊ लागलाअसतांना महाराष्ट्र राज्य सरकार मधील काही चाणक्यांनी विमा कंपन्यांच्या शुक्राचार्याशी संगणमत करुन केंद्र सरकारच्या मुळ विमा योजनेतील नियम ,ट्रिगर, हवामान, उष्णता, पर्जन्यवृष्टी प्रमाणात तत्कालीन राज्यसरकार व कृषी विभागाच्या वतीने बदलून हि योजना विमा कंपन्यांच्या हिताची केली. शेतकऱ्यांच्या नावावरअवघ्या एका दशकात कृषी विमा कंपन्यां करोडो रुपये कमवून मालामाल झाल्या व शेतकरी कंगाल झाला.महाराष्ट्र राज्यातील कृषी पिक विमा कंपन्याच्या शेतकरी विरोधी धोरणा बद्दल राज्यातील शेतकऱ्यांतअसंतोष निर्माण झाला व हळुहळू शेतकरी या योजना पासून दुरावत चालला हे लक्षात घेऊन राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान कृषी पिक विमा योजना बाबत नवीन धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे तो स्वागतार्थ आहे.

महाराष्ट्र राज्यात नव्याने पंतप्रधान कृषी पिक विमा योजना प्रभावीपणे राबवून देशाचे पंतप्रधान मा नरेंद्र मोदी यांचे समृद्ध शेतकरी व संरक्षित शेती हे स्वप्न साकार करण्यासाठी आयुर्विमा महामंडळा प्रमाणे महाराष्ट्र राज्यात कृषी पिक विमा महामंडळाची स्थापना करण्यात यावी व स्वतंत्र यंत्रणे द्वारे या योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी,या योजनेतून खाजगी विमा कंपन्यां वगळण्यात याव्यात तसेच पर्जन्यवृष्टी ची आकडेवारी जिल्हा महसूल विभागाने प्रमाणित केलेली स्विकारण्यात यावी असे ही प्रा. डॉ. नामदेव सानप यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या कडे दिलेल्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे .

**फळपीक विमा योजना शेतकरी हिस्सा कमी करावा**

फलोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान कृषी फळपीक विमा योजना सुरू केली.या योजनेत शेतकरी सहभागी झाले परंतु या योजनेच्या मुळ नियमात बदल करून हि योजना अधिकतम विमा कंपन्यांच्या हिताची केली गेली आहे. शेतकऱ्यांचा हिस्सा प्रमाण वाढवले त्यामुळे या योजनेपासून ही शेतकरी दुरावले. २०१५-१६ची मुळ फळपीक विमा योजना पुन्हा सुरू करण्यात यावी व मुळ योजना नुसार शेतकरी हिस्सा घेण्यात यावा. व सर्व हवामान , ट्रिगर, पर्जन्यवृष्टी प्रमाण पूर्वीप्रमाणे ठेवावेत . अशी मागणी प्रा. डॉ. नामदेव सानप यांनी आपल्या निवेदनात केली आहे.

# भव्य बौद्धाचार्य-श्रामणेर शिबिराचे मंगलमय वातावरणात उद्घाटन!

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा जि.बीड पूर्व अंतर्गत माजलगाव तालुका शाखेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन,सांची बुद्ध विहार,केसापूरी कॅम्प,माजलगाव येथे दहा दिवसीय बौद्धाचार्य-श्रामणेर शिबीर दिनांक ०३ मे रोजी पूज्य भंते दीपरत्न यांच्या नेतृत्वात व आद डॉ.भागवत साळवे (ता.अध्यक्ष माजलगाव) यांच्या अध्यक्षतेखाली मंगलमय वातावरणात सुरू झाले.

या श्रामणेर शिबिरात २९ शिबिरार्थ्यांचा पूज्य भंते दीपरत्न यांच्या हस्ते पबज्जा विधी संपन्न झाला. या शिबिराचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष अड बाबासाहेब भगवानराव धन्वे यांच्या हस्ते मेणबत्ती प्रज्वलित करून करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरासाठी एस. बी.मोरे (उपाध्यक्ष संस्कार जि.बीड पूर्व) यांची पूर्णवेळ केंद्रीय शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. शिबीर उद्घाटन



प्रसंगी,कमलताई डोंगरे (जिल्हाध्यक्ष महिला बीड पूर्व) लिलाताई उजगरे (उपाध्यक्ष संस्कार महिला) शामराव वाघमारे, आशाताई मोरे, संजिवनीताई धन्वे (संस्कार सचिव, जि.बीड पूर्व), के.व्ही. साळवे (सचिव पर्यटन-प्रचार जि.बीड पूर्व), बी. सी. डोंगरे, शोभाताई भोजने,शारदाताई तांगडे (जिल्हा संघटक बीड पूर्व) मंदाताई साळवे (ता.अध्यक्ष माजलगाव महिला),विष्णू तूपसागर (ता.अध्यक्ष धारूर), गुलाबराव धाईजे (ता. उपाध्यक्ष संस्कार),व इतर माजलगाव शहर व ता. पदाधिकारी,उपासक-उपासिका मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ वक्ते (सरचिटणीस ता. माजलगाव) यांनी केले.या शिबीराची सांगता दिनांक १२ मे २०२५ रोजी तथागत भगवान बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंतीदिनी करण्यात येणार आहे. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी माजलगाव ता. व शहर शाखेचे सर्व सन्मानिय पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# घरेलु महिला कामगार मेळाव्यास प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक कामगार दिनानिमित्त यानिमित्त मानवलोक जन सहयोग येथे घरेलु कामगार महिलांचा मेळावा नुकताच संपन्न झाला. यावेळी प्रमोद मुंडे, वर्षा मुंडे, सुकेशिनी रामटेके, कल्पना लोहिया,अरूण आसरडोहकर,आदी उपस्थित होते.

असंघटित कामगारांनी त्यांच्या हक्कांसाठी दिलेल्या लढ्यात शहीद झालेल्या कामगारांच्या स्मरणार्थ हा दिवस कामगार दिन म्हणून आपण साजरा करतो. बदलत्या परिस्थितीत प्रश्न बदलले,मागण्या बदलल्या जग बदललं, परंतु घरेलु कामगार अजून ही बऱ्याच ठिकाणी असंघटित राहिला. त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी,संघटित होऊन काम करावे आणि त्याचा फायदा त्यांच्या कुटुंबाच्या उन्नतीसाठी व्हावा ही भावना घेऊन हा मेळावा घेतला गेला.



महिलांनी संघटित होऊन काम करावे. हक्कांसाठी लढण्यास तयार असायला हवे. मुलांच्या शिक्षणाला प्राथमिकता द्यावी असे या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कल्पना लोहिया यांनी सांगितले. तसेच मागच्या वर्षी मागणी केल्याप्रमाणे या वर्षी आपल्या गावात कामगार कल्याण चे कार्यालय सुरू झाले याबद्दल संबंधित अधिकारी यांचे आभार मानले.

महिलांनी एकत्र येऊन सरकार ला हक्कांची जाणीव करून द्यावी लागेल,त्यासाठी संघटित होणे अत्यंत आवश्यक आहे असे मत या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रमोद मुंडे म्हणाले कुटुंबासाठी धावपळ करताना स्वतः च्या आरोग्याची ही तेवढीच काळजी घ्यायला हवी, असंघटित असल्यामुळे तुम्ही असुरक्षित आहात,त्यामुळे संघटन महत्त्वाचे असल्याचे मत या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी प्रा.सुकेशिनी रामटेके यांनी सांगितले.

आज मुलींना शिकवणं आणि स्वावलंबी बनवणं किती गरजेच आहे हे सांगतानाच आपल्या कमाईतला काही वाटा फक्त स्वतः साठी वेगळा ठेवावा जो वाढत्या वयातील प्रश्न सोडण्याच्या कामी येईल असे मत वक्त्या वर्षा मुंडे यांनी व्यक्त केले.अध्यक्षीय समारोप एका कामगार महिलेने संघटित होण्याची गरज आहे असे सांगून केला.संजना आपेट आणि सावित्री सागरे यांनी स्वागतगीत गायिले या कार्यक्रमाचे नियोजन जन सहयोग चे कार्यकर्ते शाम सरवदे यांनी केले.भर उन्हात दोनशे ते अडीचशे महिला उपस्थित होत्या.

पान ६ वरून...

## पहाट संवेदनांची:

रसिकांच्या निश्चितच हृदयाजवळचा ठरेल.असे मत त्यांनी व्यक्त केले.या प्रकाशन सोहळ्याच्या सुरुवातीलाच प्रास्ताविक पर मनोगत डॉ. प्रविण काळे (संगमकर) यांनी संग्रहामागची प्रेरणा, लेखनप्रवास आणि कवितांमागच्या आठवणी रसिकांशी शेअर केल्या. जवाहर विद्यालय या संस्कार केंद्रातून ते कसे घडत गेले एक कवी म्हणून कशी ओळख निर्माण झाली. त्यांच्या आयुष्यातील गुरुचे स्थान याप्रसंगी त्यांनी सांगितले

जवाहर विद्यालयाचे माजी मुख्यध्यापक आर.डी. काळे सर यांनी पहाट संवेदनांची म्हणजे वेदना संवेदना आणि त्यातून निर्माण होणारे शब्द म्हणजेच हा काव्य संग्रह आहे. प्रवीण काळे यांचे निश्चितच भावी पिढीला मार्गदर्शक ठरणारे लेखन यानिमित्ताने समोर आले आहे. असे मत व्यक्त केले.उपस्थित रसिकांनी कवितांचा आस्वाद घेत टाळ्यांच्या कडकडाटात या सोहळ्याचा आनंद लुटला.

या वेळी संग्रहाची प्रत घेण्यासाठी रसिकांची मोठी गर्दी उसळली.

कार्यक्रमाचे अतिशय सुंदर सूत्रसंचालन हिमांशु देशमुख यांनी तर आभारप्रदर्शन ना.मा.पडलवार यांनी केले या प्रसंगी माजलगाव व परिसरातील साहित्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तायक्कांदो अकॅडमी

बलुतकर, भाग्यश्री खोसे, किंग फिटनेस सेंटरचे संचालक गिरीश हजारी व कृष्णा पुजारी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना तायक्कांदो प्रमाणपत्र व बेल्ट वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर तायक्कांदो स्पर्धा अकॅडमीच्या वतीने २३ फेब्रुवारी २०२५ रोजी अंबाजोगाईत संपन्न झाल्या होत्या असे अकॅडमी चे संचालक बालाजी कराड यांनी यावेळी बोलताना सांगितले. बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमास शहरातील विद्यार्थी, पालक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जयसिंह सोळंके यांना नवभारत

मा चेअरमन धैर्यसिल काका सोळंके यांचे चिरंजीव सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारण्याचे व्हा चेअमन,बीड जिल्हा परीषद मा सभापती जयसिंह भैया सोळंके हे सोळंके परिवाराचा राजकीय व सामाजिक वारसा सक्षम पणे पुढे चालवत राजकीय तसेच कानिफनाथ बहुउदेशीय संस्थेच्या माध्यमातुन गोरगरीब दिन दुबळ्यांची सेवा त्यांच्या हातून घडत आहे.

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता

अनिल गलांडे, दत्ता सुरवसे, सविता भालेराव, बापू नवसुपे, हारून मोमीन, विष्णू भालेराव, शुभम थोरवे,देवराव थोरवे,संदीप जगदाळे, घनश्याम भालेराव, संजय जाधव, आश्रुबा जाधव, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख तसेच राजकीय, शैक्षणिक ,धार्मिक ,आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची सिवेज ट्रीटमेंट प्लांट कांचनवाडीला भेट सांडपाणी प्रक्रिया करण्याच्या आधुनिक कार्यक्षम पद्धतीबद्दल घेतली माहिती

**बीड । प्रतिनिधी**

**आदित्य पॉलिटेक्निक च्या विद्यार्थांना सिवेज ट्रीटमेंट प्लांट कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक भेट दिली. यावेळी जलजन्य रोगांचा प्रसार रोखून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यात एसटीपीची काय भूमिका आहे. प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे समुदाय आणि परिसंस्थांवर काय परिणाम होतात. हे विद्यार्थी समजून घेतले. पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन आणि प्रक्रिया या बद्दल विद्यार्थ्यांनी सविस्तर माहिती घेतली.**

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाविद्यालयाचे पी. डी. दुधाळ, जी. एम. खालापुरीकार, ए.आर. मुंडे, आर.एस. वरपे यांची उपस्थिती होती.

पर्यावरण विज्ञान, स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यास करणारे विद्यार्थी वर्गात शिकलेल्या सैद्धांतिक संकल्पनांचा व्यावहारिक उपयोग प्रत्यक्षपणे पाहण्यासाठी असा शैक्षणिक अभ्यास भेटीचे आयोजन केले जाते. द्रव यांत्रिकी, सूक्ष्मजीवशास्त्र आणि रासायनिक अभिक्रियांचे तत्व वास्तविक जगात कसे वापरले जातात याची संपूर्ण माहिती या भेटीत विद्यार्थ्यांना मिळाली. सांडपाणी प्रक्रियेमधील आधुनिक आणि कार्यक्षम पद्धतीचा



विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. ज्यामध्ये स्क्रीनिंग, ग्रिट काढून टाकणे, बेसिनमध्ये जैविक उपचार आणि निर्जंतुकीकरण. सांडपाणी प्रक्रियांचे महत्त्व: जलजन्य रोगांचा प्रसार रोखून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यात एसटीपीची महत्त्वाची भूमिका विद्यार्थ्यांनी समजून घेतली. प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे समुदाय आणि परिसंस्थांवर होणारे परिणाम विद्यार्थी समजून घेतले.

कांचनवाडी एसटीपीमध्ये दररोज १६१ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता आहे. ज्यामुळे नवी मुंबईतील एसटीपी वगळता ते राज्यातील सर्वात मोठ्या एसटीपींपैकी एक आहे. हे भारत सरकारच्या लघु आणि मध्यम शहरांसाठी शहरी पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत () बांधण्यात आले आहे. सध्या, सांडपाणी निर्मिती सुमारे १०७ एमएलडी आहे. पंपिंग स्टेशनमधील कच्चे सांडपाणी इनलेट चेंबरमध्ये आणले जाते.नंतर ते मोठे घन पदार्थ काढून टाकण्यासाठी यांत्रिक स्क्रीनमधून जाते. स्क्रीनिंगनंतर, सांडपाणी ग्रिट रिमूव्हल चेंबरमध्ये वाहते. प्राथमिक प्रक्रिया (स्क्रीनिंग आणि ग्रिट रिमूव्हल) केल्यानंतर, गुरुत्वाकर्षणाद्वारे सांडपाणी एसबीआर बेसिनमध्ये निर्देशित केले जाते. एसबीआर बेसिनमध्ये एअर ब्लोअर, डिफ्यूझर्स, रिटर्न ॲक्टिव्हेटेड स्लज (आरएएस) पंप, सरप्लस ॲक्टिव्हेटेड स्लज (एसएएस) पंप, डिकेंटर, ऑटो १ व्हॉल्व्ह आणि प्रक्रिया चक्रांच्या स्वयंचलित नियंत्रणासाठी प्रोग्रामेबल लॉजिक कंट्रोलर (पीएलसी) सुसज्ज आहेत. या औद्योगिक भेटी करिता ४० विद्यार्थी आणि ४ प्राध्यापक सहभागी झाले होते.

**परिक्षेत्र भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होते**

महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान दिले जाते. आपण जे शिकलो आहोत. ते जर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समोर दिसले अनुभवता आले. प्रत्यक्ष कृतीतून शिकता आले तर त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होते. सिवेज ट्रीटमेंट प्लांटला विद्यार्थ्यांनी दिलेल्या भेटीमुळे पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन प्रक्रिया त्यांना पूर्ण पणे समजली. निरीक्षण केल्याने विद्यार्थ्यांना खाम नदी सारख्या जलसाठ्यात सोडण्यापूर्वी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी केलेल्या प्रक्रियेची संपूर्ण माहिती मिळाली. ही माहिती त्यांना भविष्यात उपयुक्त ठरणार आहे.

-डॉ. राहुल खडके, प्राचार्य आदित्य पॉलीटेकनिक, बीड

# बीजोत्पादन क्षेत्राचा विकास अन् जमिनीचे आरोग्य सुधारणार

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व ‘महाबीज’मध्ये सामंजस्य करार

पुणे : नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-२ अंतर्गत राज्यातील २१ जिल्ह्यांमधील एकूण ६९५९ गावांमध्ये विविध कृषी विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. हवामान अनुकूल पीक वाणांचे बीजोत्पादन, जमिनीच्या सुपीकतेसाठी उपाययोजना, फळबाग व बांबू लागवड, तसेच जिवाणू खतांची निर्मिती यांसारख्या घटकांचा समावेश असणार आहे. यामुळे बीजोत्पादन क्षेत्राचा विकास होण्यास, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास व जमिनीच्या आरोग्यात सुधारणा होण्यास निश्चित मदत होणार आहे. या हेतूने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व ‘महाबीज’मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी प्रकल्प संचालक परिमल सिंह, ‘महाबीज’चे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



या सामंजस्य करारामुळे राज्यातील २१ जिल्ह्यांतील सुमारे १५ हजार महाबीज बीजोत्पादक शेतकऱ्यांना स्त्रोत बियाण्यांच्या किमती व बीज प्रमाणीकरण नोंदणी शुल्क परताव्याच्या माध्यमातून आर्थिक साह्य मिळणार आहे. महाबीजमार्फत उत्पादित जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा आणि जैविक खतांचा संघ ‘महाजैविक’ या उत्पादनांचा शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात येणार आहे. तसेच महिला शेती शाळांच्या माध्यमातून तीन हजार महिला शेती शाळांमध्ये सहभागी ९० हजार महिला शेतकऱ्यांना प्रति हंगामानुसार प्रत्येकी एक किलो ट्रायकोडर्मा आणि २५० मिलि महाजैविक याप्रमाणे एकूण ९०० क्विंटल ट्रायकोडर्मा व २२,५०० लिटर महाजैविक पुरवले जाणार आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने परिमल सिंह यांनी अकोला येथील महाबीजच्या बीज परीक्षण प्रयोगशाळा, बीज प्रक्रिया केंद्र आणि मुख्यालयास भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. या प्रसंगी ‘पोकरा’चे मृद् विज्ञान विशेषज्ञ विजय कोळेकर व ‘महाबीज’चे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# शेतीच्या सुधारणांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर भर

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंचे प्रतिपादन

मुंबई : शाश्वत शेतीच्या वाटचालीसाठी कृषी विभाग काम करत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत कार्यालयीन सुधारणा मोहिमेत सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या मंत्रालयीन विभागामध्ये पहिल्या टप्प्यात कृषी विभागाने ६६.१५ टक्के गुण प्राप्त करत तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. भारतीय गुणवत्ता परिषदेकडून विभागाने केलेल्या कामांचे मुल्यांकन करण्यात आले. कृषी विभागात शेतकऱ्यांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना, नव्या योजनांची अंमलबजावणी, पारदर्शकता, नवकल्पना, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या बाबींवर भर दिला असल्याचे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की, पदभार स्वीकारल्यानंतरच्या या १०० दिवसांच्या कालावधीत शेतकरी आणि शेतीच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहोत. विभागीय परिसंवाद दौ-याच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी संवाद साधला. पुणे येथे महाराष्ट्रातील पहिली कृषी अधिकारी व कर्मचारी कार्यशाळा यशस्वी झाली. बियाणे- खत -किटकनाशक उत्पादक कंपन्या आणि विक्रेते संघटनांसोबत गुणवत्तेची खात्री, बाजारातील उपलब्धता आणि संभाव्य समस्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. कृषी मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, ॲग्रीस्टेक या (शेतकरी आयडी उपक्रम) आयडीद्वारे सर्व योजनांचा लाभ एकाच ओळखीद्वारे मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची खरी संख्या व माहिती अचूकपणे उपलब्ध होणार आहे



तसचे राज्यात ९२ लाख शेतकरी तयार झाले आहेत त्यामुळे शेतकरी डेटाचा मजबूत आधार तयार झाला आहे. एक खिडकी सेवा उपक्रमामध्ये सर्व कृषी योजना, सेवा आणि माहिती एका प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांसाठी अर्ज, ट्रॅकिंग, आणि तक्रार निवारण एकाच ठिकाणी ॲप व वेब पोर्टलच्या माध्यमातून सेवा प्रदान होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

१०० दिवसात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानावर भर

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, सूक्ष्म सिंचन योजना,कृषी यांत्रिकीकरण योजना, जमीन आरोग्य पत्रिका वितरण यासह केंद्र व राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या आहेत. कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा, तक्रार निवारण, कार्यालयीन बाबी आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर या बाबी यावर १०० दिवसात भर दिला आहे. अधिक प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी वाढली असल्याचेही कृषीमंत्री ॲड. कोकाटे यांनी सांगितले.

# मे महिन्यात कसे असेल हवामान, पावसाची शक्यता ?

पुणे : मागील काही दिवसांपासून राज्यात उष्णतेची लाट वाढली आहे. मे महिन्यात तापमानात अजून वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात तापमान सर्वाधिक असून कोकण किनारपट्टीलगत उष्णता वाढल्याचे सांगण्यात येत आहे. मे महिन्यात राज्यातील हवामान कसे असेल याबाबत हवामान विभागाने माहिती दिली असून पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

देशाच्या बहुतेक भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे (दक्षिण द्वीपकल्पीय भारताचे अनेक भाग आणि पूर्व भारतातील काही भाग वगळता) जिथे कमाल तापमान सामान्य ते सामान्यपेक्षा कमी असण्याची शक्यता आहे. मे २०२५ मध्ये, देशातील बहुतेक भागात किमान तापमान सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. मे २०२५ मध्ये, वायव्य आणि मध्य भारत आणि लगतच्या पूर्व भारतातील अनेक भागात उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. राजस्थान, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, गंगीय पश्चिम बंगाल आणि गुजरात, ओडिशा, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि लगतच्या तेलंगणा आणि उत्तर कर्नाटकातील काही भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

मे २०२५ मध्ये संपूर्ण देशात सरासरी पाऊस सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे ( १०९%). देशाच्या अनेक भागात सामान्य ते सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. वायव्य मध्य, पूर्व आणि ईशान्य भारतातील काही भाग वगळता सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. सामान्यत: मे महिन्यात उत्तरेकडील मैदानी प्रदेश, मध्य भारत आणि द्वीपकल्पीय भारतातील लगतच्या भागात सुमारे ३ दिवस उष्णतेची लाट असते. मे २०२५ दरम्यान, वायव्य आणि मध्य भारताच्या अनेक भागांमध्ये आणि लगतच्या पूर्व भारतातील सामान्यपेक्षा जास्त उष्णतेच्या लाटेचे दिवस असण्याची शक्यता आहे. राजस्थान, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, गंगेचा पश्चिम बंगाल आणि गुजरात, ओडिशा, छत्तीसगड, महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये आणि लगतच्या तेलंगणा आणि उत्तर कर्नाटकच्या अनेक भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.


उष्णतेच्या लाटेदरम्यान, वाढलेले तापमानामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः वृद्ध, मुले आणि पूर्वीपासून आरोग्य समस्या असलेल्या लोकांसाठी, ज्यांना उष्णतेमुळे होणारे आजार जसे की उष्माघात आणि उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. याव्यतिरिक्त, दीर्घकाळापर्यंत अति उष्णतेमुळे डिहायड्रेशन होऊ शकते आणि पॉवर ग्रिड आणि वाहतूक व्यवस्था यासारख्या पायाभूत सुविधांवर ताण येऊ शकतो.



# जनावरांची पोटफुगी : कारणे आणि उपाय

मानवी आणि जनावरांमधील अन्न पचन संस्थेमध्ये खूप मोठा फरक आहे. जनावरांमध्ये जठर हे चार विभागात विभाजित झालेले असते आणि त्यांची शरीररचना जटिल कर्बोदके उदाहरणार्थ हिरवा चारा, ज्वारी/मका धांडांचे पचन करून त्यातून शरीराला लागणारी ऊर्जा तयार करण्यात प्रगत असते. त्या उलट साधी लवकर पचणारी कर्बोदके म्हणजे पोळी, भात, शिजलेली डाळ जर पाळीव जनावरांच्या (गाय, म्हैस, बैल, शेळी, मेंढी) खाण्यात आली तर त्याचे अती शीघ्र पचन होऊन जठराच्या पहिल्या भागात लॅक्टिक आम्लाची निर्मिती होते. यामुळे जठरातील पचन क्रिया बंद पडत आम्लाचे प्रमाण वाढून जीवघेणी पोटफुगी होऊन उपचाराअभावी अशा जनावराचा मृत्यू ओढवतो. समारंभातील उरलेले अन्न, शिळी फळे आणि सडका भाजीपाला गैरजबाबदारीने उकिरड्यावर फेकण्यात येतो आणि भुकेली जनावरे चाऱ्याअभावी या अन्नाकडे आकर्षित होतात. नकळत जास्त प्रमाणात याचे सेवन केल्यामुळे पोटफुगी आजार जनावरांमध्ये उद्भवतो. या आजाराची गंभीरता लक्षात घेणे जरुरी आहे. कारण बऱ्याचदा लवकर पचणारी कर्बोदके खाऊन अशी बरीचशी जनावरे पहिल्या ८ ते १० तासात उपयुक्त उपचाराअभावी दगावतात.

कारणे : गैरजबाबदारीने उकिरड्यावर टाकलेले समारंभातील उरलेले शिळे अन्न, नासाडलेली फळे या आजाराचे मुख्य कारण ठरतात. चाऱ्याची कमतरता आणि भुकेने त्रस्त जनावरे याकडे



आकर्षित होऊन आणि हे अन्न खाऊन आजारास बळी पडतात. बऱ्याचदा उन्हात वाळत घातलेले धान्य (गहू, तांदूळ, डाळी) सुद्धा फिरत्या जनावरांचे लक्ष वेधून ते खाल्ल्यामुळे या आजाराचे कारण ठरू शकते. काही विशेष सणानिमित्त (पोळा, बेंदूर) शेतकरी आपल्या गाई, बैलांना आंघोळ घालून, रंगरंगोटी करून ओवाळून पुरणपोळी खाऊ घालतात. अशा सणानंतर पशू चिकित्सालयात पोटफुगी हा आजार झालेली जनावरे येतात. याचे विश्लेषण केल्यानंतर असे आढळून आले की पूर्वी पुरणपोळी खाऊ घालण्याचे प्रमाण एक किंवा दोन घरापुरते मर्यादित असे. आता हेच प्रमाण २५ ते ३० घरांपर्यंत वाढल्यामुळे अपचन होऊन जनावरे आजारी पडतात.

लक्षणे : जनावरे चारा खाणे थांबवतात. फुगलेल्या पोटावर हाताने दाब दिल्यास ‘खळ खळ’ असा आवाज येतो. नाका-तोंडातून हिरवट द्रव स्त्रवतो. जनावर शक्तिहीन होत खाली बसते. हळूहळू एका अंगावर झोपते. हे या आजाराचे अतिशय गंभीर लक्षण आहे. वेळेवर आजाराची गंभीरता लक्षात घेऊन पशुवैद्यकाच्या मदतीने उपचार न केल्यास जनावर या आजारास बळी पडतात.

उपाययोजना : आजारात जनावरांना खूप तहान लागते, तरी पाणी पिऊ द्यायचे प्रमाण मर्यादित ठेवावे लागते. कारण जठारामध्ये अगोदरच पाण्याचा खूप मोठा साठा असतो. त्यामुळे फुफ्फुसांवर दाब पडून श्वसनाला त्रास होतो. जितक्या लवकर होईल तितक्या लवकर पुढच्या उपचारांसाठी आजारी जनावराला जवळच्या पशू चिकित्सालयात घेऊन जावे अन्यथा जनावर दगावण्याची शक्यता वाढते. पशुतज्ज्ञ आजाराची पुढील चाचणी करून आधुनिक उपचार पद्धतीने जनावराचा प्राण वाचवण्यास प्रयत्नशील राहतो. पशुवैद्यकीय मदत मिळेपर्यंत खाण्याचा सोडा १ ग्रॅम प्रति किलो वजनाच्या (गाईला ३०० ते ३५० ग्रॅम व शेळी किंवा मेंढीस २५ ते ३० ग्रॅम) प्रमाणात पाण्यात मिसळून पाजावे. हे मिश्रण पाजताना जनावराला ठसका लागू नये याची काळजी घ्यावी. आजाराचे गांभीर्य लक्षात घेऊन जनावरांना लवकर पचणारी कर्बोदके (गव्हाच्या पोळ्या, तांदूळ, शिजलेला भात, हॉटेल/ समारंभातील उरलेले अन्न) खाण्यास प्रतिबंध करावा.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:

भारतीय आगमन दिन : गुयाना, १८३८ पासून.
आंतरराष्ट्रीय सुईण दिन

### महत्वाच्या घटना

१२६० : कुबलाई खान हा मंगोलियाचा सम्राट बनला.
१८८३ : राष्ट्रीय चळवळीचे संस्थापक तसचं, एक पत्रकार म्हणून कर्तव्य बजावत असतांना तुरुंगात जाणारे सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे पहिले भारतीय पत्रकार ठरले.
१८९३ : न्यूयॉर्क शेरबाजाराचा निर्देशांक कोसळला. देशभर मंदीस सुरुवात.
१९०१ : विष्णू दिगंबर पलुस्करबुवा यांनी लाहोर येथे गंधर्व महाविद्यालयाची स्थापना केली.
१९२० : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर पॅरिसमध्ये रेड क्रॉस अँड रेड क्रेसेंट सोसायटीज (आयएफआरसी) या आंतरराष्ट्रीय महासंघाची स्थापना करण्यात आली.
१९३६ : इटालियन सैन्याने इथिओपियातील आदिसअबाबा शहराचा ताबा घेतला.
१९४४ : महात्मा गांधींची तुरुंगातून सुटका.
१९५५ : पश्चिम जर्मनीला सार्वभौमत्त्व प्राप्त झाले.
१९६४ : युरोप परिषदेने ५ मे हा युरोप दिन घोषित केला.
१९९७ : जयदीप आमरे या साडेपाच वर्षीय बालकाने गोव्यातील मांडवी नदी पोहून पार केली. एवढ्या छोट्या बालकाने ही नदी पोहून पार करण्याची ही पहिलीच घटना आहे.
१९९९ : दक्षिण पाकिस्तानातील हडप्पा येथे केलेल्या उत्खननात पुरातत्त्ववेत्त्यांना सर्वात प्राचीन लिपीचे अवशेष मिळाले.
२००५ : ब्रिटन देशांतील लेबर पार्टीचे नेता टोनी ब्लेयर यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली.
२०१० : इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी(विद्यापीठ) ने (इग्नू) सर्व कोर्समधील लैंगिक कामगार आणि त्यांच्या आश्रीतांचे शुल्क माफ करण्याची घोषणा केली.
२०१७ : सार्क उपग्रह म्हणून ओळखला जाणारा दक्षिण एशिया उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

८६७ : उडा जपानी सम्राट (मृत्यू: १९ जुलै ९३१)
१४७९ : गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू (मृत्यू: १ सप्टेंबर १५७४)
१८१८ : कार्ल मार्क्स जर्मन तत्त्वज्ञ व कम्युनिझमचे प्रणेते (मृत्यू: १४ मार्च १८८३)
१८६४ : निले ब्लाय उर्फ एलिझाबेथ जेन कोचरन शोध्पात्राकारितेच्या जनक यांचा पीट्सबर्ग येथे जन्म.
१९११ : भारतीय शिक्षक व कार्यकर्ते प्रितलाता वडेदार यांचा जन्म. (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३२)
१९१६ : ग्यानी झैलसिंग भारताचे ७ वे राष्ट्रपती, पंजाबचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री (मृत्यू: २५ डिसेंबर १९९४)
१९२९ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रसिद्ध क्रांतिकारक अब्दुल हम्मिद कैसर यांचा जन्मदिन.
१९३५ : राष्ट्रीय पुरस्कार तसचं, हिंदी साहित्य संस्था व गुजरात गौरव पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रकार, लेखक, व्यंगचित्रकार, पत्रकार, पर्यावरणवादी, नाटककार आणि पटकथा लेखक आबिद सुरती यांचा जन्मदिन.
१९३७ : परमवीर चक्र सन्मानित भारतीय सैन्य अधिकरी कर्नल होशियार सिंह यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय जनता पक्षाचे राजकीय नेता व हरियाणा राज्याचे विद्यमान (१० वे) मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांचा जन्मदिन.
१९७० : प्रसिद्ध भारतीय नेमबाज समरेश जंग यांचा जन्मदिन.
१९८९ : लक्ष्मी राय तमिळ अभिनेत्री यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : नेपोलियन बोनापार्ट, फ्रांसचा सम्राट.
१८२१ : फ्रान्सचा सम्राट, असामान्य सेनापती आणि कर्तबगार प्रशासक नेपोलियन बोनापार्ट याचे सेंट हेलेना बेटावर निधन (जन्म: १५ ऑगस्ट १७६९)
१९१८ : त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ ‘बालकवी’, मराठीतील प्रसिध्द कवी.
१९१८ : त्र्यंबक बापूजी ठोंबरे ऊर्फ ’बालकवी’ यांना जळगावजवळील भादली स्टेशनपाशी रेल्वेचे रूळ ओलांडताना आगगाडीखाली सापडून मरण आले. (जन्म: १३ ऑगस्ट १८९०)
१९४३ : रामकृष्णबुवा वझे गायक नट, बलवंत संगीत मंडळी आणि ललित कलादर्श या नाटक कंपन्यांमधे त्यांनी गायनगुरु म्हणून काम केले. केशवराव भोसले, मास्टर दीनानाथ, भालचंद्र पेंढारकर, हरिभाऊ घांग्रेकर हे त्यांचे काही नामांकित विद्यार्थी होत. (जन्म: २८ नोव्हेंबर १८७२)
१९४५ : पं. रामकृष्णबुवा वझे गायनाचार्य यांचा पुणे येथे निधन.
१९८९ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९ (जन्म: ३० ऑगस्ट १९०४ मुंबई)
२००० : वि. मा. कुलकर्णी मुलांच्या समस्यांचे अभ्यासक व समाजशास्त्रज्ञ (जन्म:)
२००६ : नौशाद अली संगीतकार (जन्म: २५ डिसेंबर १९१९)
२००७: लेसर चे निर्माते थिओडोर हेरॉल्ड मॅमन यांचे निधन. (जन्म: ११ जुलै १९२७)
२००८ : बास्किन-रॉबिन्स चे सहसंस्थापक इरब रोबिन्स यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १९१७)
२०१२ : भारतीय क्रिकेटपटू सुरेंद्रनाथ यांचे निधन. (जन्म: ४ जानेवारी १९३७)
२०१७ : भारतातील उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला लीला सेठ यांचे निधन.

# शेतकऱ्यांना बियाणे, खते व पीक कर्ज, उपलब्ध करुन द्या - पालकमंत्री मुंडे

जालना । प्रतिनिधी

खरीप हंगामातील पेरण्या सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते व पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी आतापासूनच योग्य नियोजन करण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसवंर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी यावेळी दिले. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात खरीप हंगामपूर्व तयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्रीमती मुंडे या बोलत होत्या. यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रभारी जिल्हा पोलीस अधीक्षक आयुषकुमार नोपाणी, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख, यांची प्रमुख उपस्थिति होती.



यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, कृषी विभागाने यावर्षी खरीप हंगामातील पेरणीचे प्रस्तावित क्षेत्राच्या प्रमाणात बियाणे रासायनिक खते शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच पावसाअभावी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येवू नये. पुरेसा पाऊस झाल्यावरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी. यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यामध्ये व्यापक जनजागृती करावी. तसेच पीक पेरणीची योग्य पद्धत, बियाणांची निवड आणि पेरणीपूर्व प्रक्रिया, पेरणीचा योग्य कालावधी आदीबाबतीची माहिती शेतकऱ्यांना द्यावी. शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक तंत्र पोहोचविण्यासाठी क्षेत्रिय कर्मचारी आणि शेतकऱ्यांनी समन्वय ठेवावा. शेतक-यांना विविध पिकांच्या पेरणीची योग्य वेळ आणि पद्धत, त्या पिकांवर येणारे रोग आणि त्याअनुषंगाने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती देण्यासाठी कृषी विभागाने विशेष मोहीम राबवावी. जमिनीची उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल यासाठी प्रयत्न करावा. जिल्ह्यात बोगस बियाणे आणि रासायनीक खतांची विक्री होवू नये, यासाठी पथके स्थापन करुन, दोषींवर कायदेशीर कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच पंचनामे करुन बियाणे नमुने तपासण्यापेक्षा बियाणे पुरवठादारांकडील साठे तपासून त्याचवेळी त्याची गुणवत्ता तपासावी. तसेच जादा दराने खत विक्री करणे, खतांचा साठा करून ठेवणे, असे अवैध काम करणाऱ्या विक्रेत्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी व त्यांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी योग्य उपाययोजना कराव्यात. तसेच खरिप हंगामाकरीता शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातून होणारे कर्ज वितरणाचे उद्दिष्ट हे जून पर्यंत पूर्ण करावे. शेतकऱ्यांना बँकेत चकरा माराव्या लावू नये याची दक्षता घ्यावी. तसेच पात्र लाभार्थ्यांना पंतप्रधान कुसुम योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनाचा लाभ वेळेत मिळावा यासाठी नियोजन करावे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा अशा सूचना पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी संबंधीतांना दिल्या.

तसेच जिल्ह्यातील ज्या गावातून टँकरची मागणी होताच, त्या गावास तात्काळ पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच टँकर, पुरक नळ योजना, विहिर अधिग्रहण इत्यादी उपाययोजनांद्वारे सर्वसामान्य नागरिकांना पाणी टंचाईचा त्रास होणार नाही याची जिल्हा प्रशासनाने दक्षता घ्यावी असे निर्देश ही पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले. जिल्ह्यात ६ लाख २९ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरणीसाठी नियोजन आज सादर करण्यात आले. त्यात सर्वाधिक क्षेत्रावर म्हणजेच २ लाख २१ हजार हेक्टरवर सोयाबीन तर २ लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस या पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. कापूस आणि सोयबीन पिकासाठी बियाण्यांची उपलब्धता करण्यात आली आहे. जिल्ह्यात कापूस पिकाच्या नियोजित क्षेत्रावर पेरणीसाठी बियाण्यांची ११ लाख ५१ हजार पाकिटे लागणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात आले असून, सोयाबीन पिकासाठी ६५ टक्के घरच्या बियाण्यांचा वापर होणार आहे. तसेच उर्वरीत ३५ टक्के म्हणजे ५७ हजार ५६५ क्विंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. सोबतच खरीप ज्वारी, मुग, तूर, उडीद, भुईमूग, सूर्यफुल, तीळ या पिकांच्या पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व पिकांच्या लागवडीसाठी ७३ हजार ०७६ क्विंटल बियाण्याची आवश्यकता असून, त्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. तसेच खरिप हंगामाकरीता आवश्यक व अपेक्षित बियाणे, खते, किटकनाशके यांचे योग्य नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आल्याचे यावेळी माहिती देण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते जालना कृषी विभागाच्या व्हॉटस् अप चॅनल आणि घडिपत्रिकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी बैठकीस उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रेषीत मोघे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परमेश्वर वरखडे, यांच्यासह अधिकारी कर्मचारी होते.

## माल निघाला पण भाव ढासळले

### बारदाणा, वाहतूक भाडं, पिशव्या भरायलाही परवडेना

लिंबागणेश। प्रतिनिधी

गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांचा कांदा उत्पादनाकडे कल वाढला आहे .त्यामुळे खरीप, रब्बी हंगामात कांद्याकडे शेतकऱ्यांचा ओढा वाढला असुन दोनही ऋतुत कांदा लागवड करत आहेत.कांदा उत्पादनात वाढ झाली परंतु कांद्याला सद्यपरिस्थितीत भाव नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. भर उन्हाळ्यात कांदा काटणीला मजुर मिळत नाहीत.त्यातच उन्हाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्यावर असताना शेतकरी कांदा काढणी करत आहेत. कांद्याला फेब्रुवारी मध्ये प्रति किलो २०-३० रूपये बाजारभाव होता. तो टिकुन राहिल असे वाटत असतानाच बाजारभाव कमी होऊन ११ रुपये किलोवर आला आहे. कांदा उत्पादक शेतकरी ढासळलेल्या भावामुळे चिंतेत असुन भाडे वाहतुक,बारदाणा, पिशव्या भरायला सुद्धा परवडेना अशी खंत बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी जालिंदर सुर्यभान ढास यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलुन दाखवली.



बीड तालुक्यातील कांदा उत्पादक गाव म्हणून ओळख असलेल्या मुळुकवाडी येथील शेतकऱ्यांना कांदा पिकाने साथ दिली नाही. मुळुकवाडी येथील कांदा उत्पादक शेतकरी जालिंदर सुर्यभान ढास यांनी यावेळी माल निघलाय पण भाव नाही,अडीच एकर कांदा लागवड केली होती.२०० पोते कांदा बेंगलोरच्या बाजारात विकला, सध्या ११ रूपये किलो भाव असुन वाहतूक खर्च,आडत, हमाली आदी जाऊन ५-६ रूपये भाव पडत असल्याचे सांगत बारदाणा आणि पिशव्या भरायला परवडत नसल्याची खंत व्यक्त केली. कांद्याचे भाव वाढल्यानंतर शासनाकडून दर रोखण्यासाठी प्रयत्न केले जातात.केंद्रीय पथक येतात,पाहणी करतात, निर्यातबंदी सारखी पावले उचलतात,आयात केली जाते. मात्र कांद्याचे भाव कोसळल्यानंतर मात्र शासन शेतकऱ्यांकडे ढुंकूनही पहात नाही. त्यामुळे भाव वाढल्यानंतर सरकारने लक्ष देऊ नये अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.

## पहाट संवेदनांची: आत्मशोधाची कविता-साळेगावकर

माजलगाव। प्रतिनिधी

प्रसिद्ध कवी डॉ. प्रविण काळे (संगमकर) लिखित 'पहाट संवेदनांची' या भावस्पर्शी कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा अनंत भालेराव सभागृह,महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, माजलगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडला. साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीत या संध्याकाळी कविता, गीते आणि संवाद यांची रंगतदार मैफल सजली. या प्रसंगी अध्यक्षस्थानी शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार मोहनराव सोळंके होते,तर संग्रहाचे प्रकाशन माजी शिक्षक आमदार तथा नवविकास मंडळाचे कार्यवाह श्री.डी. के. देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले.कवितासंग्रहावर सखोल भाष्य करणारे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रभाकर साळेगावकर यांची विशेष उपस्थिती लाभली.यावेळी बोलताना प्रभाकर साळेगावकर म्हणाले, आपण काय जगलोत यापेक्षा आपण काय वागतो





आहोत हे मांडणारा काव्यसंग्रह पहाट संवेदनांची हा आहे

"'पहाट संवेदनांची' या संग्रहातून जीवनातल्या नाजूक भावना, लहानसहान प्रसंगांमधले हळवे क्षण, प्रेम आणि निसर्गाच्या कुशीतले अनुभव फार सुरेखपणे शब्दबद्ध झाले आहेत.''प्रमुख मार्गदर्शन करताना माजी आमदार डी.के देशमुख यांनी नवविकास मंडळाच्या पाचव्या कर्मचाऱ्यांचे हे पुस्तक प्रकाशित होत आहे याचा आनंद वाटतो पहाट संवेदनांची काव्यसंग्रह खरोखरच वाचनीय आहे.असे विचार स व्यक्त केले.अध्यक्ष समारोप करताना माजी आमदार मोहनराव सोळंके यांनी मूल्य जपणाऱ्या शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून तसेच विद्यार्थी म्हणून राहीलेले कवी प्रवीण काळे यांच्या लेखणीवर साहित्यावर येथील वातावरणाचा प्रभाव जाणवतो. पहाट संवेदनांची हा काव्यसंग्रह रसिकांच्या निश्चितच हृदयाजवळचा ठरेल.असे मत त्यांनी व्यक्त केले.या प्रकाशन सोहळ्याच्या सुरुवातीलाच प्रास्ताविक पर मनोगत डॉ. प्रविण काळे (संगमकर) यांनी संग्रहामागची प्रेरणा, लेखनप्रवास आणि कवितांमागच्या आठवणी रसिकांशी शेअर केल्या. जवाहर विद्यालय या संस्कार केंद्रातून ते कसे घडत गेले एक कवी म्हणून कशी ओळख निर्माण झाली. त्यांच्या आयुष्यातील गुरुचे स्थान याप्रसंगी त्यांनी सांगितले जवाहर विद्यालयाचे माजी मुख्यध्यापक आर.डी. काळे सर यांनी पहाट संवेदनांची म्हणजे वेदना संवेदना आणि त्यातून निर्माण होणारे शब्द म्हणजेच हा काव्य संग्रह आहे. प्रवीण काळे यांचे निश्चितच भावी पिढीला मार्गदर्शक ठरणारे लेखन यानिमित्ताने समोर आले आहे. असे मत व्यक्त केले.उपस्थित रसिकांनी कवितांचा आस्वाद घेत टाळ्यांच्या कडकडाटात या सोहळ्याचा आनंद लुटला. या वेळी संग्रहाची प्रत घेण्यासाठी रसिकांची मोठी गर्दी उसळली. कार्यक्रमाचे अतिशय सुंदर सूत्रसंचालन हिमांशु देशमुख यांनी तर आभारप्रदर्शन ना.मा.पडलवार यांनी केले या प्रसंगी माजलगाव व परिसरातील साहित्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धनगर जळका ग्रामपंचायत समोर निषेध आंदोलन

पाटोदा । प्रतिनिधी

दिनांक एक मे रोजी लेखी निवेदन देऊनही व पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लेखी आदेश असतानाही ग्रामपंचायत कार्यालय धनगर जवळका यांनी जाणीवपूर्वक ग्रामसभा ही पुढे ढकलली. तसेच गावातील अनेक प्रश्न प्रलंबित असताना गावातील निधी कुठे खर्च केला जातो याची कुठलीही माहिती गावातील नागरिकांना उपलब्ध करून दिली जात नाही ती माहिती उपलब्ध करून द्यावी २०२३ ते २०२५ या कालावधीत आलेला निधी कुठे गेला.साधारणपणे वित्त आयोगाचा पाच वर्षाचा तीस लाख रुपये एवढा निधी आहे तसेच गावाला स्वच्छता पुरस्कारामधून मिळालेले दहा लाख रुपये असे एकूण ४० लाख रुपये ग्रामपंचायतीच्या हातात असताना व इतर योजनेचेही मोठ्या प्रमाणात रक्कम ग्रामपंचायतला मिळत असताना पावसाळ्याच्या तोंडावर काम मात्र शून्य दिसत आहे. गावामध्ये सहा प्रकारचे सव्वा कोटी रुपये किमतीचे खडीकरणाचे रस्ते मंजूर असून त्याचे जवळपास पंधरा लाख रुपयापर्यंत रक्कम उचलली आहे परंतु साबळे वस्ती ते सांगळे वस्ती हा रस्ता सोडता इतर कुठल्याही रस्त्यावर खडीचा एकही खडा ही टाकला नसून गावातील नागरिकांना पावसाळ्यात मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. या सर्व गोष्टींची ग्रामपंचायतला जाणीव होण्यासाठी प्रकाश खाडे यांनी हे निषेध आंदोलन केले.

## सोमेश्वर मंदिर येथे गरीब मुलीचा वाढदिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

बीड येथील शहरातील बार्शी रोडवरील अत्यंत ऐतिहासिक असलेले व सर्वांच्या नवसाला पावणारे असे श्री भगवान सोमेश्वर महादेवाचे मंदिर या ठिकाणी बऱ्याच दिवसापासून सेवेकरी म्हणून काम करत असलेले हनुमंतराव गायकवाड मामा यांची कन्या अतिशय गरीब कुटुंबातील कुमारी राणी हनुमंतराव गायकवाड या मुलीचा वाढदिवस लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने साजरा करताना लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष यांनी पुष्पहार येथे उपस्थित असलेल्या महिलांच्या हस्ते कुमारी राणी गायकवाड यांना घालून व केक सेलिब्रेशन करून या गरीब मुलीचा वाढदिवस साजरा केला हा वाढदिवस साजरा केल्यानंतर या कुटुंबाला अतिशय आनंद झाला.

श्रीमंताच्या वाढदिवसाला तर कोणीही शुभेच्छा देण्यासाठी जात असतात परंतु गरिबाला कोण देणार हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून काल जिल्हा पुणे व महाराष्ट्राची राजधानी मुंबईचा दौरा करून आज जिल्हा बीड येथे संस्थापक अध्यक्ष आले असता त्यांना





माहिती झालं की एका गरीब कुटुंबातील मुलीचा वाढदिवस आहे त्यांच्या पाठीमागे एवढे काम असताना कामामध्ये बिझी असताना व व्याप असताना देखील त्यांनी कुठल्याही प्रकारचा वेळेचा विचार न करता तात्काळ ते घरी न जाता लगेचच श्री सोमेश्वर मंदिर बार्शी रोड या ठिकाणी जाऊन गायकवाड कुटुंबाची भेट घेऊन हनुमंतराव मामा यांची लाडकी कन्या कुमारी राणीताई गायकवाड या मुलीला वाढदिवसानिमित्त पुष्पहार महिलांच्या हस्ते घालून व केक सेलिब्रेशन करून उदंड आयुष्याच्या मनस्वी कोटी कोटी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा आदर्श मुख्याध्यापक तथा मा संपादक साहेब मा श्री आत्माराम जी ओव्हाळ सर तसेच लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक तथा दैनिक न्याय टाइम्स बीड तालुका प्रतिनिधी संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर तसेच बीडीएस डॉक्टर मॅडम जी तसेच त्यांच्या समवेत उपस्थित असलेल्या दुसऱ्या बीडीएस डॉक्टर मॅडम जी तसेच गायकवाड कुटुंबातील सर्व सदस्य राणी गायकवाड यांचे छोटे बंधू त्यांच्या आई वडील सह गायकवाड परिवार सह सोमेश्वर मंदिरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाघेश्वरीदेवीच्या कलशारोहन वर्धापन दिनानिमित्त किर्तन महोत्सव

बीड । प्रतिनिधी

इथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र मन्मथ स्वामी देवस्थान पासून जवळ कपिलधारवाडीचे ग्रामदैवत वाघेश्वरी माता देवीचे मंदिर आहे. या देवीच्या मंदिराच्या दुसर्या कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन महंत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री महंत ह.भ.प.हरिहारनंद भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी यांच्या मार्गदर्शनाने व आशीर्वादाने मंगळवार दि.६ मे २०२५ रोजी वैशाख शुद्ध ।। ९ ।। पासून भव्यदिव्य पाच दिवसीय कीर्तन महोत्सवास प्रारंभ होत आहे.

या कीर्तन महोत्सवामध्ये मंगळवार दि. ६/५/२०२५ रोजी ह.भ.प.नाना महाराज कदम बंकट स्वामी मठ संस्थान मेकनूर, बुधवार दि.७/५/२०२५ ह.भ.प अक्षय महाराज पिंगळे विनोदाचार्य (बीडकर), गुरुवार दि. ८/ ५ / २०२५ ह.भ.प.कल्याण महाराज काळे शिवचरित्रकार (अहिल्यानगर), व शुक्रवार दि. ९/५ /२०२५ ह.भ.प. शंकर महाराज चिंचकर भागवताचार्य (बिडकुचीवाडी) याचे हरीकिर्तन सेवा होणार आहेत. शनिवार दि.१०/५/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये ह.भ.प.गु.महंत लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकट स्वामी संस्थान मठ नेकनूर पंढरपूर आळंदी दे. यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे.या नाम सप्ताहात महंत ह.भ.प.हरिहारनंद भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन



मोरेश्वर संस्थान कोळवाडी ,विश्वनाथ आप्पा सलगार श्री. क्षेत्र कपिलधार तसेच दत्त उपासक वैजनाथ महाराज शिंदे दत्त संस्थान बालाघाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मृदंगाचार्य: ह.भ.प. योगेश महाराज जोगदंड कोळवाडी, ह.भ.प.सुशील महाराज शिंदे कपिलधारवाडी ,गायनाचार्य: ह.भ.प.शिवाजी महाराज निवडे कामखेडा, शेषराव महाराज चव्हाण कोळवाडी, महादेव महाराज चव्हाण, अर्जुन महाराज तांगडे, सुशील महाराज शिंदे यांची आहे. तबलावादक :ह.भ.प लखन महाराज शिंदे कर्झणी, काकडा नेतृत्व: ह.भ.प हरिदास महाराज खुळे, ह.भ.प. वसंत महाराज शिंदे यांची आहे.काल्याच्या कीर्तनाने सांगता व महाप्रसाद होणार आहे तरी या कीर्तन महोत्सवाचा व श्रवण भक्तीचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे.

## जनता दरबारात जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांना निमंत्रित करा

### दिव्यांग कर्मचारी संघटनेची जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था पूर्वपदावर निर्माण करण्याकरिता तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीयुत.अविनाश पाठक हे सबसेल अपयशी ठरल्याने त्यांची जिल्हाधिकारी पदावरून जिल्हावासीयांच्या जनतेचा रोष पत्कारून मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशाने शासनाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती व्ही.राधा यांच्या आदेशान्वये तडकाफडकी बदली करण्यात आल्याने दि:२४/०४/२०२५ रोजी भारतीय प्रशासन सेवेत थेट नियुक्त झालेले कर्तव्यदक्ष व क्रियाशील सनदी अधिकारी म्हणून श्रीयुत विवेक जॉन्सन हे जिल्हाधिकारी पदावर रुजू होताच त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा जिल्हावासीयांच्या मनामध्ये निर्माण केला आहे.

श्री जॉन्सन हे जिल्हाधिकारी पदावर रुजू होताच दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी जिल्हावासीयांच्या व दिव्यांग व्यक्तींच्या समस्यांचे निराकरण करण्याकरिता आपल्या सनियंत्रणात जिल्हा





जनता दरबाराचे आयोजन करावे या स्वरूपाची प्रमुख मागणी त्यांना भारतीय संविधान प्रत सन्मानपूर्वक भेट देऊन केली होती व दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी असेही जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले की, आजतागायत आपल्या पदाचा कार्यभार पाहणाऱ्या यापूर्वीच्या कोणत्याही जिल्हाधिकाऱ्याने जिल्हावासीयांकरीता शासकीय जनता दरबाराचे आयोजन केलेले नाही. म्हणून आठवले यांनी केलेल्या मागणीचा जिल्हाधिकारी महोदयांनी गांभीर्याने विचार करून आपल्या कार्यालयात जनता दरबार आयोजनास प्रारंभ केला. परंतु जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती व दुर्लक्षित समाज घटकांच्या समस्या या प्रामुख्याने जिल्हा परिषद व पोलीस प्रशासन या शासकीय विभागांतर्गत असल्याने या समस्यांचे तात्काळ निराकरण करण्याकरिता आपल्या समक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद श्रीयुत.आदित्य जिवणे व पोलीस अधीक्षक श्रीयुत.नवनीत कॉवत या प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्यांना जनता दरबारात जाणीवपूर्वक उपस्थित राहण्याबाबत आदेशीत करावे. जेणेकरून दिव्यांग व्यक्तींना व इतर नागरिकांना उद्भवणाऱ्या समस्यांचे गांभीर्यपूर्वक व तात्काळ निराकरण करून त्यांना यथोचित न्याय देणे सुलभ होईल. या प्रांजळ हेतूने अशा प्रमुख अधिकाऱ्यांना जनता दरबारात आपल्या समवेत उपस्थित राहण्यास लेखी आदेश निर्गमित करावेत या स्वरूपाची मागणी जिल्हाधिकारी श्रीयुत विवेक जॉन्सन यांच्याकडे शासनमान्यता प्राप्त दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

## पाटोदा नगरपंचायतीच्या हलगर्जी कारभारामुळे शहर तहानलेलेच

### नागरिकांना पाण्यासाठी महिन्याला हजारोंचा खर्च

पाटोदा। प्रतिनिधी

महाराष्ट्र दिनाच्या ६५ व्या वर्धापन दिना निमित्त संपूर्ण राज्यात जल्लोष पाहायला मिळाला, पण बीड जिल्ह्यातील पाटोदा शहरातील जनतेला अजूनही मूलभूत गरजांपैकी एक असलेली पाणी मिळत नाही, ही खंत काही वेगळीच आहे.शहरासाठी आतापर्यंत लाखो नव्हे, तर कोट्यवधी रुपये खर्च करून विविध पाणी योजना राबवण्यात आल्या, पण त्या योजनांचे लाभ मात्र कागदावरच का असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रत्यक्षात नागरिकांना नळाला आठवड्यातून एकदाच, तेही अपुरं पाणी मिळतं. काही भागांत दहा-पंधरा दिवस नळालाच पाणी येत नाही.टँकरवर अवलंबित्व, खर्च नागरिकांच्या डोक्यावर स्वतःच्या घरात नळ असूनही पाणी मिळत नसल्यामुळे नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहावं लागतं आहे तसेच शुद्ध फिल्टर युक्त पाण्यासाठी एका





कुटुंबाला महिन्याला सरासरी १००० ते २००० पर्यंत खर्च करावा लागत आहे. हे अतिरिक्त ओझं अनेक कुटुंबांच्या अर्थसंकल्पावर ताण देतंय.घोषणांचा पाऊस, पण पाणी मात्र नाही पाटोदा नगरपंचायत हद्दीत जलकुंभ, उपसा योजना, जलशुद्धीकरण प्रकल्प अशा अनेक योजनांचे उद्घाटन झाले, निधीही मंजूर झाला, पण नागरिकांना अजूनही पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. या योजनांवर शंका घेत आता पाटोदा नगरपंचायत अंतर्गत नागरिक प्रश्न विचारू लागले आहेत पाणी नाही नळाला''कोट्यवधी रुपय गेले कुठं?''

# कुंडलीका धरणातील अवैध गाळ उपसासाठी गाळ माफिया व अधिकारी यांचे संगनमत?

## कोट्यवधीच्या गाळ उपशासाठी लाखो रुपयांचे डील, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करावी

धारुर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील धुनकवाड येथील कुंडलिका धरणातील शासनाने भूसंपादित केलेल्या जमिनीवरील अवैध गाळ उपसा हा मोठ्या प्रमाणात सुरू असून हा गाळ शेतकऱ्यांना न देता हा गाळ वीटभट्टी धारकांना विकला जात असून गाळ उपशासाठी तालुका प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी व गाळमाफिया यांचे संगणमत असून कोट्यावधी रुपयांच्या गाळासाठी लाखो रुपयांची डिल झाले असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे.







आ.प्रकाश सोळंके यांनी गाळ मुक्त धरण गाळ युक्त शिवार योजनेतुन गाळ शेतकऱ्यांसाठी खुला करावा

कुंडलिका धरणावरील गाळ उपसा हा माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी गाळमुक्त धरण व गाळमुक्त शिवार या शासनाच्या योजनेतून शेतकऱ्यांसाठी गाळ खुला करून दिला तर शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होईल परंतु आ.प्रकाश दादा सोळंके हे ही याकडे दुर्लक्ष का करत आहेत व त्यांनाही गाळमाफीयांना पोसायचे आहे की काय ?असाही प्रश्न निर्माण होत आहे.तरी प्रकाश दादा यांनी या गाळ मुक्तधरण व गाळयुक्त शिवार या शासनाच्या योजनेचे उद्घाटन करून कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपसा थांबवावा व हा गाळ वीटभट्टी धारकांच्या घशात जात असलेला गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी खुला करून देण्यात यावा यामुळे शेतकरी वंचित राहणार नाहीत अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपशासाठी महसूल विभागातील अधिकारी मंडळअधिकारी, तलाठी याचबरोबर पाटबंधारे विभागातील अधिकारी कर्मचारी यांचेही हात ओले असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे.याकडे हे सर्व अधिकारी व कर्मचारी दुर्लक्ष का करतात या वरुन दिसत आहे. तरी या कोट्यावधी रुपयांच्या गाळ विक्रीचा हा गोरख धंदा गाळमाफिया यांच्याकडून होत असून यामुळे या कोट्यावधी रुपयांच्या अवैध गाळ विक्रीसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना लाखो रुपयांचे डील होत आहे तरी याकडे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतःहा या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे लक्ष देऊन अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना धडा शिकवावा व शेतकऱ्यांचे नंदनवन करण्यासाठी शेतकऱ्यांना हा गाळ खुला करून देऊन शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

### गाळाच्या टिप्परमुळे रस्त्याची लागली वाट

गेल्या अनेक वर्षापासून धुनकवाड पाटी ते धुनकवाड ह्या रस्त्याची दुरवस्था झाली होती परंतु गेल्या दोन वर्षांपूर्वी हा रस्ता डांबरीकरण झाला असून या रस्त्यावर आता अवैध गाळ उपसाची टिप्पर क्षमतेपेक्षा जास्त भरुन भरधाव वेगाने वाहत असून या रस्त्याची खूप दुरावस्था होत आहे.पुन्हा हा रस्ता खराब झाला तर हा रस्ता पुन्हा लवकर होणार नाही याची काळजी ग्रामस्थांनी घेतली पाहिजे.

### आ.प्रकाश सोळंके यांनी शेतकऱ्यांसाठी गाळ खुला करावा

कुंडलीका धरणाची निर्मिती होऊन जवळपास तीस ते चाळीस वर्षाचा कालावधी ओलांडला असून सद्यस्थितीला मोठ्या प्रमाणात गाळाचे प्रमाण वाढल्याने पाणीसाठा कमी होऊ लागला आहे.या अनुषंगाने धरणातील गाळ उपसा करून शिवारात टाकावा यामुळे शिवार ही सुपीक होईल आणि पाणीसाठा ही वाढेल असा दुहेरी उद्देश डोळ्यासमोर ठेवून शासनाने ''गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार'' ही योजना आणली आहे. परंतु धुनकवाड येथे असे न होता हा गाळ विटभट्टी धारकांच्या घशात घातला जात असुन शेतकरी गाळापासुन वंचित राहत ओात.तरी आ. प्रकाश दादा सोळंके यांनी हा गाळ शेतकऱ्यांसाठी खुला करून देण्यात यावा अशी मागणीतील वर्गातून होत आहे.

### गाळ माफिया फोफावत आहे

गेल्या काही महिन्यापासून बीड जिल्हा हा अनेक विषयांनी चर्चेत असून प्रशासनात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रमुख अधिकारी खमके लाभले आहेत.यामुळे वाळू माफिया, राख माफिया, भू-माफिया यांना मोठ्या प्रमाणात चपराक बसली असून आता गाळ माफिया डोके वर काढत असून हे गाळ माफिया कोट्यावधी रुपयांचा अवैध गाळ विक्री करत असून तालुका प्रशासनाचे अधिकारी यांच्या आशीर्वादाने हे चालु आहे तरी ह्या गाळमाफीयांना हे जिल्ह्यातील खमके अधिकारी कधी आवर घालुन यांच्यावर कधी कारवाई करणार.



पाटोदा : नगरपंचायत अंतर्गत रमाई आवास योजनेतून २१० घरकुल मंजूर करून दिल्याबद्दल समाजबाधवाच्या वतीने बहुजन नायक आमदार सुरेश आणणा धस याचा तथागत गौतम बुद्ध यांची मुर्ती व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सभापती किशोर अडागळे डॉ नरेंद्र जावळे .शकर जाधव . .चेतन जावळे.सुरज जावळे .निखील अडागळे व समाजबाधव मोठ्या प्रमाणात उपस्थितीत होता

# पहाट संवेदनांची: आत्मशोधाची कविता- सुप्रसिद्ध साहित्यिक प्रभाकर साळेगावकर

माजलगाव । प्रतिनिधी

प्रसिद्ध कवी डॉ. प्रविण काळे (संगमकर) लिखित 'पहाट संवेदनांची' या भावस्पर्शी कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा अनंत भालेराव सभागृह,महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, माजलगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडला. साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीत या संध्याकाळी कविता, गीते आणि संवाद यांची रंगतदार मैफल सजली.

या प्रसंगी अध्यक्षस्थानी शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार मोहनराव सोळंके होते,तर संग्रहाचे प्रकाशन माजी शिक्षक आमदार तथा नवविकास मंडळाचे कार्यवाह



श्री.डी. के. देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले.कवितासंग्रहावर सखोल भाष्य करणारे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रभाकर साळेगावकर यांची विशेष उपस्थिती लाभली.यावेळी बोलताना प्रभाकर साळेगावकर म्हणाले,

आपण काय जगलोत यापेक्षा आपण काय वागतो आहोत हे मांडणारा काव्यसंग्रह पहाट संवेदनांची हा आहे

'''पहाट संवेदनांची' या संग्रहातून जीवनातल्या नाजूक भावना, लहानसहान प्रसंगांमधले हळवे क्षण, प्रेम आणि निसर्गाच्या कुशीतले अनुभव फार सुरेखपणे शब्दबद्ध झाले आहेत.''प्रमुख मार्गदर्शन करताना माजी आमदार डी.के देशमुख यांनी

नवविकास मंडळाच्या पाचव्या कर्मचाऱ्यांचे हे पुस्तक प्रकाशित होत आहे याचा आनंद वाटतो

पहाट संवेदनांची काव्यसंग्रह खरोखरच वाचनीय आहे.असे विचार स व्यक्त केले.अध्यक्ष समारोप करताना

माजी आमदार मोहनराव सोळंके यांनी मूल्य जपणाऱ्या शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून तसेच विद्यार्थी म्हणून राहीलेले

कवी प्रवीण काळे यांच्या लेखणीवर साहित्यावर

येथील वातावरणाचा प्रभाव जाणवतो. पहाट संवेदनांची हा काव्यसंग्रह पान ३ वर

# योगतज्ञ डॉ. राधा तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला व मुलींना योग प्रशिक्षण - जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

दिवसेंदिवस वाढत चाललेले हवामानातील बदल, प्रदूषणाची पातळी, दूषित पाणी आणि मर्यादेपलीकडचे ध्वनी प्रदूषण यामुळे मानवी आरोग्य अधिकाधिक कमकुवत होत चालले आहे. धकाधकीच्या जीवनशैलीमुळे मानव आपल्या अमूल्य शरीराकडे दुर्लक्ष करीत आहे. याकडे लक्ष वेधत बीड शहरातील विख्यात नगरसेविका श्रीमती जयश्री विलास विधाते यांनी महिलांसाठी आणि मुलींसाठी योग शिबिराचे आयोजन





केले आहे.

हे शिबिर २ मे ते १७ मे २०२५ या कालावधीत, सकाळी ५ ते ६ या वेळेत संभाजीनगर नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराला बीड जिल्ह्यातील विख्यात आंतरराष्ट्रीय योगपटू, सुवर्णपदक विजेती व योगतज्ञ डॉ. राधा सचिन तांबे (घोलप) या मार्गदर्शन करत आहेत.

योग क्षेत्रामध्ये पारंगत असलेल्या डॉ. राधा तांबे या योगासोबतच उपचारात्मक योग व संतुलित आहाराविषयी देखील योग्य मार्गदर्शन देणार आहेत. शिबिराची सुरुवात अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसादात झाली असून परिसरातील अनेक महिला व मुलींनी सहभाग नोंदवला आहे.

या उपक्रमाचा अधिकाधिक महिलांनी व मुलींनी लाभ घ्यावा, असे आवाहन योग शिक्षिका डॉ. राधा तांबे आणि नगरसेविका श्रीमती जयश्री विधाते यांनी केले आहे.

# माजलगाव शहरातील तीन दुकानं चोरट्यांनी फोडली

## सतत होणाऱ्या चोऱ्यांनी व्यापारी वैतागले


माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी असणाऱ्या तीन दुकानांचे शटर चोरट्यांनी तोडल्याची घटना दि ०४ मे रविवार रोजी पहाटे ३:०० ते ३:३० वाजण्याच्या सुमारास घडल्या आहेत.दरम्यान सतत होणाऱ्या चोऱ्यांमुळे माजलगाव शहरातील व्यापारी कदरले असून पोलिसांवर रोष व्यक्त करण्यात येत आहे.

माजलगाव शहरात सतत चोरीचे सत्र सुरू आहे.काही दिवसापूर्वीच मोंढ्यात घडलेली चोरीची घटना ताजी असतानाच दि ०४ मे रविवार रोजी पहाटे बीड रोड या मुख्य रस्त्यावर असणाऱ्या खुर्शिद कुरेशी यांच्या सिटी बिर्याणी हाऊस या हॉटेलचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला. परंतु दुकानात मौल्यवान वस्तूसह नगदी रक्कम मिळाली नाही.परंतु त्याच वेळी चोरट्यांनी बाजूलाच असणाऱ्या पठाण यांच्या होनेस्टि मेन्स वेअर कपड्याच्या दुकानाचे शटर तोडन्याचा प्रयत्न केला.तर गजानन मंदिर रोडवर धपाटे यांचे ज्ञानेश्वरी मेडिकलचे शटर तोडून चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्हीचा डी.व्ही.आर व गल्ल्यात असणारे पाच हजार रुपये रोकड लंपास केली आहे.सदरील ठिकाणी पोलिसांनी भेटी दिल्या आहेत. अज्ञात चोरट्या विरोधात माजलगाव शहर पोलिसांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान नेहमीच घडणाऱ्या चोऱ्याच्या घटनांनी माजलगाव शहरातील व्यापारी कदरले असून याबाबत व्यापाऱ्यांमधून पोलिसां विषयी रोष व्यक्त करण्यात येत आहे.

# जिल्ह्यातील शेतकरी संपतोय?

## आत्महत्येचा वाढता आकडा हे सरकारचे




सारणी । दिनकर जाधव

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून संपूर्ण जगात नावलौकिक मिळवलेला देश आहे, परंतु हाच कृषिप्रधान देश आणि येथील सरकार शेतकऱ्यांनाच वेठीस धरत आहे कारण नेहमीच येणाऱ्या आसमानी आणि सुलतानी संकटांना तोंड देण्यासाठी सरकारकडे कुठलेही तंत्रज्ञान अथवा सरकारने शेतकऱ्यांना कोणत्याच कायद्यात शेतकऱ्यांना जगवण्याचे कलम नसल्यामुळे येथील यंत्रणा शेतकऱ्यांनाच लुटत आहे.

कृषी प्रधान देशात कृषीला प्राधान्याने चालवणाऱ्या शेतकऱ्यांचेच या देशात शोषण केले जाते मग ते सरकार असो की व्यापारी असो यामधून शेतकरी नेहमीच भरडला जातो आणि त्याला वाली कोणीच नसतो. कधी आसमानी संकटापुढे शेतकरी हातबल होतो तर कधी सुलतानी संकटापुढे शेतकरी हातबल होतो आणि याच हतबलतेतून शेतकरी आत्महत्याला प्रवृत्त होतो. परंतु यावर सरकार कडून कोणतीच ठोस उपाययोजना आखली जात नाही. याच सरकारच्या शेतकऱ्या विषयीच्या असलेल्या निष्क्रिय धोरणामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वाढते प्रमाण हे सरकारला जाग आणणारे आहे परंतु खरेच सरकार यांनी जागी होईल का हा मात्र प्रश्न आहे

विभागीय आयुक्तांच्या अहवालातून गंभीर स्थिती उघड

१ जानेवारी २०२५ ते २५ एप्रिल २०२५ या ११५ दिवसांच्या कालावधीत बीड जिल्ह्यात तब्बल ९० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. म्हणजेच सरासरी दर ३० तासाला एका शेतकऱ्याचा बळी जात असल्याचे या सरकारी आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. फेब्रुवारी महिन्यात (२८ दिवस) २५ आत्महत्या तर मार्च महिन्यात (३१ दिवस) २७ शेतकरी आत्महत्यांची नोंद करण्यात आली आहे. महसूल विभागाने विभागीय आयुक्तांना सादर केलेल्या अहवालातून ही गंभीर स्थिती उघड झाली आहे.



# तायक्कांदो अकॅडमी अंबाजोगाईचा प्रमाणपत्र व बेल्ट वितरण कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तायक्कांदो अकॅडमी अंबाजोगाई व किंग्ज फिटनेस सेंटर जिम आयोजित तायक्कांदो प्रमाणपत्र व बेल्ट वितरण कार्यक्रम येथील मोहन टॉकीज कॅम्पस मध्ये संपन्न झाला.

याप्रसंगी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक तथा ज्येष्ठ क्रीडा प्रशिक्षक रमणजी सोनवळकर सर, ज्ञानेश मातेकर, सतीश पान ३ वर

# जयसिंह सोळंके यांना नवभारत- नवराष्ट्र वर्तमान समुहाचा मराठवाडा आयकॉन पुरस्कार प्रदान

## सर्व स्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव

**वडवणी । प्रतिनिधी**

राजकीय क्षेत्राच्या माध्यमातून सामजीक ऊपक्रमाची दखल घेत नवभारत नवराष्ट्र वर्तमान समुहाच्या

वतीने रत्न सुंदर सहकारी साखर कारखान्याचे व्हा चेअरमन,बीड जिल्हा परीषदेचे विद्यमान सभापती जयसिंग भैय्या सोळुंके यांना आयकॉन या पुरस्काराने छत्रपती संभाजीनगर




येथे ना.संजयजी शिरसट,सामाजिक न्याय मंत्री, मा.ना.श्री. अतुलजी सावे, बहुजन कल्याण मंत्री , आ.श्री.विक्रम काळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन चा वर्षा होत आहे.महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री स्व सुंदररावजी सोळुंके साहेब यांचे नातु,माजी मंत्री प्रकाश दादा सोळंके यांचे पुतने, पान ३ वर

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत पुंडी गावचा सन्मान

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पुंडी गाव संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आष्टी तालुक्यातील पुंडी ग्रामपंचायत संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये २०२२-२३ यावर्षी पुंडी गावची निवड करण्यात आली होती. पुरस्काराचे वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प बीड श्री. आदित्या जिवने, श्री. वासुदेव सोळंके, श्रीमती संगीतादेवी पाटील , श्री. सुरेश केंद्रे, श्री. प्रदीप काकडे, डॉ.श्री. ज्ञानोबा मोकाटे, श्री. राजेंद्र मोराळे, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने,यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये पुंडी ग्रामपंचायत कार्यालय यांना संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुरस्काराने सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी सन्मान स्वीकारताना सरपंच प्रतिभा थोरवे, ग्रामविकास अधिकारी अनिता कवडे, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब थोरवे, उपसरपंच बाळासाहेब थोरवे, दिसत आहेत. पूंडी ग्रामपंचायत कार्यालयाची निवड झाल्याबद्दल आ. सुरेश (आण्णा)धस, मा.आ दरेकर नाना, ग्रामसेवक बाळासाहेब थोरवे, उपसरपंच सुनंदा थोरवे, शितल भालेराव, पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नराधम दत्ता गाडेचा फोन अश्लील व्हिडीओंनी भरलेला, वर्षात २२ हजार व्हिडीओ पाहिले, गुगल हिस्ट्रीतून माहिती समोर

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट अत्याचार प्रकरणातील नराधम दत्ता गाडे याच्यासंबंधी एक मोठी माहिती समोर आली आहे. दत्ता गाडेने एका वर्षात एक दोन नव्हे तर तब्बल २२ हजार अश्लील व्हिडीओ पाहिल्याचं त्याच्या गुगल हिस्ट्रीतून स्पष्ट झालं आहे. दत्ता गाडेच्या मोबाईल फोनमधील गुगल सर्च हिस्ट्री सायबर पोलिसांनी तपासली असता ही माहिती समोर आली. त्यामुळे दत्ता गाडेची विकृत मानसिकता समोर आली आहे.



स्वारगेट आगारात शिवशाही बसमध्ये २५ फेब्रुवारी रोजी एका पीडितेला फसवून तिच्यावर अत्याचार करण्यात आला होता. दत्तात्रय रामदास गाडे (वय ३७, रा. गुनाट, शिरूर) हा त्या प्रकरणातील आरोपी असून त्याने तरुणीवर दोन वेळा बलात्कार केल्याची घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. या अत्याचार प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिस आयुक्तांनी हा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग केला होता. गुन्हा केल्यानंतर दत्ता गाडे त्याच्या मुळगावी गुनाट गावामध्ये लपून बसला होता. पुणे पोलिसांनी गुनाट गावातील ग्रामस्थांच्या मदतीने तीन ड्रोन कॅमेरे, श्वान पथकांच्या मदतीने आणि गाडेला ताब्यात घेतलं.

पुणे पोलिसांच्या सायबर टीमने आरोपीच्या मोबाइल नंबरवरून त्याची गुगल सर्च हिस्ट्री तपासली. त्यामध्ये आरोपी गाडे वारंवार अश्लील व्हिडिओ पाहात असल्याचे दिसून आले आहे. त्याने एकाच वर्षात २२ हजार अश्लील व्हिडीओ पाहिल्याचं या तपासातून समोर आलं आहे. त्यानंतर आरोपीच्या गुगल सर्च हिस्टरी पंचनामा करण्यात आला. स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे हा सध्या येरवडा कारागृहात आहे. दरम्यान, या प्रकरणाच्या आरोपपत्रामध्ये ८२ साक्षीदार तपासून पाच साक्षीदारांचे जबाब न्यायालयात नोंदवले आहेत. या प्रकरणी एकूण बारा पंचनामे करण्यात आले असून, पाच महत्त्वाच्या पंचनाम्यांतून आरोपी गुन्ह्याच्या वेळी घटनास्थळी हजर असल्याचे थेट व घटनेतील भक्कम पुरावे आरोपपत्रात सादर करण्यात आले आहेत. या प्रकरणात पुणे पोलिसांनी एकून ८२३ पानांचे आरोपपत्र दाखल केलं आहे. दरम्यान, या प्रकरणाच्या खटल्यासाठी सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील म्हणून ड.अजय मिसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे

# पुण्यातील नवले पुलावर अपघाताचे सत्र, दारुच्या नशेत मर्सिडिज चालवली, कीर्तन करुन परत जाणाऱ्या तरुणाचा जीव घेतला

**पुणे । प्रतिनिधी**



शहरातील नवले पूल परिसरात पुन्हा एकदा अपघाताचं सत्र पाहायला मिळालं आहे. तीन वेगवेगळ्या अपघातात तिघांचा बळी गेला आहे. त्यामध्ये एका प्रकरणात महाविद्यालयातील तरुणाने दारूच्या नशेत गाडी चालवली आणि निरपराध तरुणाचा जीव घेतला. मधल्या काळात अपघातांची मालिका थांबलेल्या नवले पूल परिसर आता पुन्हा एकदा चर्चेत आल्याचं दिसंतय.

पहिला अपघात शनिवारी पहाटे ३.३० वाजता झाला. शुभम भोसले या महाविद्यालयीन तरुणाने दारू पिऊन मर्सीडिज कार चालवली आणि त्या कारने धडक दिल्याने कुणाल हुशार या तरुणाचा बळी गेला. शुभम भोसले आणि त्याचे मित्र निखील रानडे, श्रेयस सोळंखी आणि वेदांत इंद्रसिंग राजपुत या चौघांनी आधी हिंजवडी परिसरात दारु पार्टी केली. त्यानंतर ते पुणे बंगळुरु महामार्गावरुन कात्रजच्या बोगद्याच्या दिशेने गेले.

तिथून परत येत असताना वडगाव पुलावर त्यांनी किर्तनाचा कार्यक्रम उरकून घरी निघालेल्या कुणाल हुशार आणि प्रज्योत पुजारी यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यामधे कुणाल हुशारचा मृत्यू झाला. तर प्रज्योत पुजारी हा जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहे. या प्रकरणी पुण्यातील सिंहगड रोड पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारी दुपारी अडीच वाजता एका ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने त्याने तीन वाहनांना धडक दिली. त्यामध्ये एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ब्रेक फेल झाल्यानंतर ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि त्याने तीन वाहनांना धडक दिली. यामध्ये दुकाचीस्वार सरळ ट्रकच्या टायरखाली आला. या ट्रकने इतर तीन वाहनांनाही धडक दिली आहे. तिसऱ्या घटनेत शनिवारी सकाळी ७ वाजता अवजड वाहनाच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

# लोणावळा, कर्जत घाट भागात नवा बोगदा प्रस्तावित

**पिंपरी । प्रतिनिधी**

घाट भागात रेल्वेचे इंजिन घासते, वेळही जातो. त्यामुळे कर्जत ते लोणावळा दरम्यान टनेल निर्माण करण्यात येणार आहे. त्यासाठीचा २१०० कोटी रुपयांचा विकास आराखडा (डीपीआर) तयार आहे. हा डीपीआर रेल्वे बोर्डाकडे पाठविला असून, हा प्रस्ताव रेल्वे बोर्डाच्या मान्यतेच्या प्रतीक्षेत आहे.



मुंबई विभागाची रेल्वे विभागाची बैठक बुधवारी (दि.३०) पार पडली. मुंबई विभागाअंतर्गत मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल, कर्जत, उरण, नेरळ ही रेल्वे स्थानके येतात. या बैठकीत या रेव` स्थानकांवर पुरविल्या जाणार्या विविध सुविधामवर चचार करण्यात आली. कर्जत रेल्वे स्थानकाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. त्याचा डीपीआर तयार आहे. ओव्हर ब्रीजच्या कामाला गती द्यावी. खोपोलीत पर्यटन मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे त्या स्थानकाचा विकास करावा.

पनवेल रेल्वे स्थानक मॉडेल स्थानक बनविण्यात येणार आहे. दिवा ते उरण लोकल सेवा सुरू करण्यात येणार आहे. त्याबाबतचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठवावा. २१ भुयारी मार्गाचे काम सुरू आहे. त्याला गती द्यावी. काही रेल्वे स्थानके सिडकोने उभारली आहेत. त्याची देखभाल दुरुस्ती त्यांच्या माध्यमातूनच केली जात आहे. ती स्थानके रेल्वे विभागाने ताब्यात घ्यावीत. कर्जत, नेरळ, लोणावळा रेल्वे स्थानकावर सरकते जिने, लिफ्ट अशा सुविधा निर्माण कराव्यात, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

प्रवाशांसाठी पाणी, स्वच्छतागृह अशा सुविधा देण्यात याव्यात.करोना कालावधीत लोणावळा, कर्जत रेल्वे स्थानकावरील अनेक लांब पल्ल्याच्या गाड्याचे थांबे बंद करण्यात आले होते. या स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबे द्यावेत, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली. माथेरानला पर्यटक मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे माथेरानमधील अमन लॉज ते माथेरान ट्रेनच्या फेर्या वाढवल्या जाव्यात. अमृत भारत रेल्वे अंतर्गत सुरू असलेल्या रेल्वे स्थानकाच्या विकासाचा आढावा घेतला. त्या कामाला गती देण्याची सूचनाही खासदार बारणे यांनी केली आहे.

त्यावर रेल्वे संदर्भातील रखडलेली सर्व कामे वर्षभरात मार्गी लागतील. निधीची कमतरता भासणार नाही. अर्थसंकल्पात सर्वाधिक निधी महाराष्ट्राला मिळाला असल्याची माहिती रेल्वे अधिकार्यांनी यावेळी दिली. तर हा बोगदा तयार करण्यासाठी आवश्यक ती मदत मदत करण्याची ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली असल्याचेही बारणे यांनी सांगितले.

# टेम्पो-बसच्या धडकेत १९ जण जखमी; सात जणांची प्रकृती गंभीर

**नसरापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनाच्या सुटीला आलेले चाकरमानी पुणे, मुंबईकडे एका खासगी ट्रॅव्हल्स बसमधून परत जात असताना पुणे –सातारा महामार्गावर थांबलेल्या टेम्पोला बसने जोरात धडक दिली. या अपघातात बसमधील १९ प्रवाशी जखमी झाले.



यातील सात जणांची प्रकृती गंभीर आहे. तर अपघातात दोन्ही वाहनांचा चेंदामेंदा झाला असून, जखमी प्रवाशांवर नसरापूर येथील सिध्दिविनायक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सर्व जखमी सातारा जिल्ह्यातील वाई, महाबळेश्वर परिसरातील आहेत. पुणे – सातारा महामार्गावर कामथडी (ता. भोर) येथे उड्डाणपुलावर शुक्रवारी (दि.२) रात्री साडेअकराच्या सुमारास हा अपघात घडला. याबाबत प्राजक्ता सतीश धनवे यांनी राजगड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी बसचालक दत्तात्रय कचरे (वय ४०) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. प्राजक्ता धनवे (वय ३०), आदित्य सणस (वय ३३), मेघा सणस (वय २८), पायल सणस (वय १८), प्रियंका सणस (वय २०), विश्वास सणस (वय ३५), आदिती सणस (वय २१), सोनाली सणस (वय २५), राहुल सणस (वय १८ ) अमोल घाडगे (वय ३६), स्वाती घाडगे (वय ३३ ), जगन्नाथ गायकवाड, नारायण कोंढाळकर, सहदेव कोंढाळकर (वय ४७), सविता कोंढाळकर (वय ४३ ), कृष्णा अमराळे (वय ४८) सुषमा घोलप (वय ३५), रूपेश कांबळे (दोघेही रा. वाई), चालक – दत्तात्रय कचरे (वय ४०, रा. तळवडे, ता. कोरेगाव ) अशी जखमींची नावे आहेत.

सुटीसाठी आलेले सर्व चाकरमानी कामावर परत जाण्यासाठी वाई येथून ट्रॅव्हल्स बसने पुणे, मुंबईकडे जात होते. टायर फुटल्याने आयशर टेम्पो बंद अवस्थेत महामार्गावर कामथडी (ता. भोर) हद्दीत उभा होता. त्याचे इंडिकेटर चालू होते. या वेळी समोरील वाहनाने अचानक कट मारल्याने टेम्पो दिसून न आल्याने पाठीमागून आलेल्या ट्रॅव्हल्स बसची टेम्पोला जोरदार धडक बसली. त्यात बसमधील १९ प्रवाशी जखमी झाले. राजगड पोलिस आणि स्थानिक तरुणांनी जखमींना बसमधून उतरवून रुग्णवाहिकेमधून नसरापूर येथील सिद्धिविनायक रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. पुढील तपास पोलिस हवालदार अजित माने करीत आहे.

# श्री छत्रपती कारखाना बचाव पॅनेलला हादरा

**भवानीनगर । प्रतिनिधी**

श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी निवडणुकीची रणधुमाळी सुरू होण्यापूर्वीच राजकीय डावपेच करून विरोधी पॅनेलच्या ब वर्गाच्या उमेदवाराचा आपल्या पॅनेलला पाठिंबा घेऊन मोठी राजकीय खेळी केली. त्यामुळे विरोधी पॅनेलला मोठा हादरा बसला आहे.




श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीमध्ये श्री छत्रपती कारखाना बचाव पॅनेलच्या ब वर्गाच्या उमेदवाराने विरोधी पॅनेलला पाठिंबा जाहीर केला. श्री छत्रपती कारखाना बचाव पॅनेलच्या ब वर्गाचे उमेदवार सत्यजित भाऊसाहेब सपकळ यांनी क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत श्री जय भवानी माता पॅनेलला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे श्री छत्रपती कारखाना बचाव पॅनेलला निवडणुकीची रणधुमाळी सुरू होण्यापूर्वीच उमेदवाराकडून फटका बसला आहे.

या पॅनेलला २१ पैकी १६ जागांवर उमेदवार मिळाले होते. त्यामध्ये ब वर्गाचे उमेदवार सत्यजित भाऊसाहेब सपकळ यांनी विरोधी पॅनेलला पाठिंबा दिल्यामुळे आता श्री छत्रपती कारखाना बचाव पॅनेलकडे १५ उमेदवार राहिले आहेत. क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी ब वर्गाच्या उमेदवाराचा पाठिंबा आपल्या श्री जय भवानी माता पॅनेलला घेऊन श्री छत्रपती कारखाना बचाव पॅनेलला खिंडार पाडले आहे. श्री छत्रपती कारखाना बचाव पॅनेलला अडचणीत आणण्यासाठी दत्तात्रय भरणे आणखी कोणता उमेदवार गळाला लावणार आहेत किंवा कोणती राजकीय खेळी खेळणार आहेत याकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान याबाबत ब वर्गाचे उमेदवार सत्यजित सपकळ म्हणाले, श्री जय भवानी माता पॅनेलला आपण बिनशर्थ पाठिंबा जाहीर केला आहे.

# ब्रँडेडची जाहिरात, बनावटची विक्री..; पोलिसांकडून ४० हजारांचा माल जप्त




**पुणे । प्रतिनिधी**

नोव्हेटल या तारांकीत हॉटेलमध्ये लागलेल्या ब्रँडेड कपड्यांच्या सेलची जाहीरात मागील काही दिवस समाजमाध्यमात मोठ्या प्रमाणात फिरत होती.

मात्र येथील ब्रँडेड कपडे हे बनावट असल्याची तक्रार प्राप्त होताच येरवडा पोलिसांनी छापा टाकून ४० हजाराचा माल जप्त केला आहे. स्वामित्व हक्काचा भंग केल्याप्रकरणी अंकीथ राजेंद्र अगरवाल (रा.बंगलोर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी महेंद्र सोहम सिंग (३८, कसबा पेठ) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार फिर्यादीकडे काही कंपण्यांचे स्वामित्व हक्क संदर्भात अधिकारी आहे. त्यांना कळाले होती की, नोव्हेटलमध्ये एक सेल लागला असून तेथे स्वामित्व असलेल्या वेगवेगळ्या कंपण्यांचे बनावट टी शर्ट, जॅकेटस , ट्रॅकपँट, सॉक्स विक्रसाठी उपलब्ध आहेत.त्यांनी तेथे खात्री केल्यानंतर पोलिसांसह छापा टाकला. तेथून ४० हजाराचा बनावट माल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सोळुखे करत आहेत.

# पुणे रेल्वे स्थानक परिसरात २०० मीटरमध्ये वाहन पार्किंगवर बंदी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारातील अधिकृत वाहनतळ वगळता दोनशे मीटरच्या परिसरासत सर्व प्रकारची वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. या निर्णयामुळे रेल्वे स्थानकाच्या आवारातील कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. प्रवाशांची ने-आण करणाऱ्या मोटारी, रिक्षांना मुभा देण्यात आली आहे. मात्र, त्यांना जास्त काळ थांबता येणार नाही.



पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारातील दोन्ही प्रवेशद्वारांवर (इन आणि आउट गेट) बेशिस्तपणे वाहने लावण्यात येत असल्याने या भागातील वाहतूक विस्कळीत होत होती. प्रवेशद्वाराच्या परिसरात वाहने लावण्यात आल्याने कोंडी होत असल्याचे दिसून आले होते. रेल्वे स्थानकाच्या आवारातील कोंडीच्या पार्श्वभूमीवर लोहमार्ग पोलीस दलाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक रोहिदास पवार यांनी वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्याशी उपाययोजनांबाबत चर्चा केली होती. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी रेल्वे स्थानकाच्या परिसरातील दोन्ही प्रवेशद्वारांपासून २०० मीटर अंतरावर सर्व प्रकारची वाहने लावण्यास मनाई करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वी नागरिक, तसेच प्रवाशांनी लेखी सूचना, हरकती वाहतूक पोलीस उपायुक्त कार्यालयात १७ मेपर्यंत पाठवाव्यात. सर्व सूचना विचारात घेऊन अंतिम आदेश काढला जाणार आहे. दरम्यान, या आदेशाची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाकडून तेथे फलकही बसविण्यात येणार आहे.

# पुरंदर विमानतळ प्रश्नावरुन शेतकरी आक्रमक; आंदोलन मोडीत काढण्याचा शासनाचा डाव

**पुरंदर । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, पारगाव, एखतपूर, खानवडी, मुंजवडी अशा सात गावात शासनाने विमानतळ प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला असून, प्रकल्पासाठी २८३२ हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. या प्रकल्पामुळे तब्बल सात गावे कायमची विस्थापित होणार असल्याने शेतकरी कोणत्याही परिस्थितीत आपली जमीन देण्यास तयार नाहीत. यासाठी तब्बल आठ ते नऊ वर्षे शासनाच्या विरोधात लढा सुरु आहे. मात्र राजकीय शक्ती शेतकऱ्यांच्या पाठीशी नसल्याने शेतकऱ्यांची दखल घेण्यास शासन तयार नाही. कोणत्याही परिस्थितीत प्रकल्प करायचाच याच हेतूने शेतकऱ्यांना वागणूक दिली जात आहे. त्यातूनच लाठीहल्ला करण्यात आल्याचे उघड झाले आहे.



तब्बल आठ वर्षे शेतकऱ्यांनी अत्यंत संयमाने शासनाच्या विरोधात लढा दिला असतानाही शासन मात्र शेतकऱ्यांचा लढा कोणत्याही परिस्थितीत मोडून काढण्याचा प्रयत्न करीत आहे. माजी आमदार संजय जगताप यांनी मागील पाच वर्षे शेतकऱ्यांच्या बाजूने लढा दिला. मात्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होताच विद्यमान आमदार विजय शिवतारे यांनी विमानतळ प्रकल्प करणारच अशी घोषणा केली आणि तिथूनच विमानतळ प्रकल्पाला पुन्हा गती मिळाली. मात्र शेतकऱ्यांनी पुन्हा विरोध सुरु केला, मात्र सरकार एक एक पाऊल पुढे टाकत आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांनी सुरुवातीपासून संदिग्ध भूमिका घेत केवळ शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही एवढेच सांगितले, मात्र शेतकऱ्यांमध्ये ठाम विश्वास दिला नसल्याने त्यांच्यावरील शेतकऱ्यांचा विश्वास पूर्णपणे मोडून निघाला आहे. सद्यस्थितीत शेतकऱ्यांचा विमानतळ विरोधात एकाकी लढा सुरु आहे. सुरुवातीला गावातील गाव पुढार्यांनी साथ दिली, मात्र त्यातील बहुतेक पुढारी हेच दलाल असल्याने शेकडो जमिनी त्यांनीच दलालीच्या हव्यासापायी गुंतवणूकदारांच्या घशात घातल्या. एकीकडे प्रकल्पाला विरोध म्हणून दाखवायचे आणि दुसरीकडे खरेदी विक्रीचा व्यवसाय तेजीत सुरु ठेवून शेतकऱ्यांचा एक प्रकारे विश्वासघात केला आहे. सध्या शेतकऱ्यांच्या बाजूने कोणतीही मोठी ताकद उभी नाही. राजकीय पाठबळ केव्हाच संपले असून, गाव पुढारी दलाल झाले आहेत. तर जेवढे क्षेत्र गावोगावचे विकले गेले ते बाहेरच्या लोकांना दिल्याने त्यांचा पाठींबा मिळणे शक्यच नाही. उर्वरित शेतकऱ्यांची द्विधा मनस्थिती असून राजकीय लोभापायी अनेक राजकीय शेतकरी आंदोलनापासून अलिप्त आहेत, कित्येक घरांमध्ये प्रशासकीय पदावर तसेच विविध व्यवसाय निमित्त तरुण असल्याने अशी कुटुंबेही अलिप्त आहेत. सात गावातील अनेक गावात शिवसेनेची ग्रामपंचायत असल्याने त्यांची भूमिका केवळ दाखविण्यापुर्तीच ठरली आहे. त्यामुळे केवळ ४० ते ५० टक्के लोकांच्या जीवावरच कित्येक दिवस आंदोलन उभे आहे. आणि हि परिस्थिती राजकीय दलालांनी प्रशासनाला पटवून दिल्यानेच शासनाने आपली संपूर्ण ताकद पणाला लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा एकाकी लढा किती दिवस चालणार हाच मुख्य प्रश्न आहे.

# विद्यार्थ्यांना मोठा दिलासा! जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिने मुदतवाढ

**पुणे । प्रतिनिधी**

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना शासनाने मोठा दिलासा दिला असून, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (एसईबीसी) आणि इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गातून व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा शासन निर्णय जाहीर केला आहे.



पूर्वी राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिली होती. त्यानंतरही काही विद्यार्थी प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत. त्यासाठी पुन्हा मुदतवाढ मिळावी, अशी मागणी पालक आणि विद्यार्थ्यांनी केली होती. त्यामुळे जानेवारीमध्ये पुन्हा तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. मात्र, त्यानंतरही काही विद्यार्थ्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाने आता आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ देत विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. परिपत्रकानुसार २ मे, २०२५ पासून पुढील तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. हा निर्णय केवळ प्रवेश निश्चित झालेल्या, पण अद्याप जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या 'एसईबीसी' आणि 'ओबीसी' प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाच लागू असणार आहे. प्रमाणपत्र अद्याप सादर न केलेल्या विद्यार्थ्यांनी मुदतीचा लाभ घेऊन प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.